७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com   www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०५७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## ब्रिटनचे राजे चार्ल्स यांचे भाऊ अँड्र्यू यांना अटक

मुंबई (दै. संध्या) : ब्रिटनमध्ये किंग चार्ल्स यांचे भाऊ अँड्र्यू यांना अटक करण्यात आली आहे. सार्वजनिक पदावर असताना गैरवर्तन केल्याच्या संशयावरून त्यांना अटक करण्यात आली आहे. बीबीसीच्या वृत्तानुसार, गुरुवारी सकाळी ८ वाजता पोलिसांनी त्यांना सँडरिंगहॅम येथील त्यांच्या घरी ताब्यात घेतले. विशेष म्हणजे आज अँड्र्यू यांचा वाढदिवस आहे. खरंच, एपस्टीन प्रकरणातील पीडित व्हर्जिनिया गिफ्रे यांनी आरोप केला आहे की, २००१ मध्ये प्रिन्स अँड्र्यू यांनी त्या १७ वर्षांच्या असताना त्यांचे लैंगिक शोषण केले होते. तथापि, अँड्र्यू यांनी गिफ्रे यांचे सर्व आरोप फेटाळून लावले. गिफ्रे यांचे एप्रिल २०२५ मध्ये निधन झाले, मृत्यूचे कारण आत्महत्या असल्याचे म्हटले गेले. सार्वजनिक पदावर असताना गैरवर्तन करणे हा इंग्लंडमध्ये गंभीर गुन्हा मानला जातो. या गुन्ह्यासाठी व्यक्तीला हे सिद्ध करावे लागते की ती व्यक्ती चुकीची आहे हे माहित होते, तरीही त्यांनी ते करणे सुरू ठेवले. या गुन्ह्यासाठी जास्तीत जास्त शिक्षा जन्मठेपेची आहे.

# किल्ले शिवनेरीवर छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव साजरा

## छत्रपती शिवरायांच्या मार्गावर चालणे हाच विकासाचा खरा मार्ग : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पुणे (दै. संध्या)

छत्रपती शिवरायांनी दिलेला मार्ग हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे. त्यांच्या कार्याचा हा आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी २०३० साली छत्रपती शिवाजी महाराजांची ४०० वी जयंती भव्य आणि जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अभिनेता रितेश देशमुख, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज नसते तर आज भारताचा इतिहास आणि भूगोलही वेगळा असता असे नमूद करून श्री. फडणवीस म्हणाले. अनेक राजे-रजवाडे मोगलांच्या आधीपत्याखाली काम करत असताना आई जिजाऊंनी घडविलेल्या छत्रपती शिवरायांनी रयतेचे स्वराज्य स्थापन करून हिंदुस्थानाला नवी दिशा दिली. छत्रपती शिवरायांनी १८ पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून स्वराज्याची स्थापना केली. 'हे माझे राज्य नसून रयतेचे राज्य आहे,' अशी भूमिका त्यांनी घेतली. देव, देश आणि धर्मासाठी लढा देण्याची प्रेरणा देत त्यांनी सामान्य जनतेला मोगलांच्या जोखडातून मुक्त करण्याचे कार्य केले. त्यांच्या राज्यात समता, सन्मान, न्याय आणि स्त्रीसुरक्षा यांना प्राधान्य होते. शेतकरी समाधानी राहील, अन्याय-अत्याचार होणार नाहीत, अशी राज्यव्यवस्था त्यांनी उभी केली, असे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यकारभारात विविध सुधारणा करताना शिवाजी महाराजांनी सुमारे ५० प्रकारचे कर रद्द करून सुटसुटीत करप्रणाली निर्माण केली. पाणी, जंगल यांचे नियोजन केले. भविष्यातील धोका ओळखून समुद्रमार्गे होणाऱ्या आक्रमणांना रोखण्यासाठी जलदुर्ग उभारले. पोर्तुगीजांवर विजय मिळवून पश्चिम किनारपट्टी सुरक्षित केली. छत्रपतींच्या कारकिर्दीत समुद्रमार्गे आक्रमण करण्याची हिंमत कुणालाही झाली नाही, अशा शब्दात त्यांनी महाराजांचे द्रष्टेपण मांडले.



आमदार श्री. सोनवणे यांनी आपले विचार व्यक्त केले. प्रारंभी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शिवजन्मस्थानी पारंपरिक वेशातील महिलांनी शिवरायांची महती सांगणारा पाळणा गायिला. राष्ट्रगीत तसेच 'गर्जा महाराष्ट्र माझा' या राज्यगीताची धून पोलीस बँड पथकाने वाजवून सलामी दिली. त्यानंतर पोलीस पथकाने बंदुकीच्या तीन फैरी झाडून छत्रपती शिवरायांना मानवंदना दिली. यावेळी जिल्हा परिषद शाळच्या लहान विद्यार्थ्यांच्या पथकाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रसंग सुंदर पद्धतीने सादर केले. त्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी बाल शिवाजी व माँ जिजाऊंच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची पालखी वाहीली. यावेळी मुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रगत प्रगतशील शेतकरी स्व. पंकज वामन, खारखर येथील टाटा कॅन्सर रुग्णालयाचे विभाग प्रमुख डॉ. विनोद सीताराम हांडे, लेफ्टनंट अजिंक्य मेहेर, माजी पंचायत समिती सभापती शिवाजीराव खैरे आणि उपलेफ्टनंट श्रुतिका ताथवडे यांना शिवनेर भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, मराठा सेवा संघाचे पदाधिकारी यांच्यासह शिवभक्त उपस्थित होते.

शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष राज्यातील गड किल्ले देत असल्याचे नमूद करीत श्री. फडणवीस पुढे म्हणाले, पंतप्रधानांच्या पुढाकाराने शिवनेरीसह छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून नामांकित झाले असून २७ देशांनी एकमताने त्यास मान्यता दिली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी संबंधित प्रमाणपत्र स्वीकारले. त्यामुळे शिवरायांचे किल्ले आता अधिकृतपणे जागतिक वारसा स्थळ म्हणून गौरवले गेले आहेत. शिवरायांच्या कार्याची साक्ष असलेले राज्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. मराठा सेवा संघाच्या निवेदनावर राज्य सरकार सकारात्मक काम करेल, तसेच मांडण्यात आलेल्या सर्व मुद्द्यांवर विचार करण्यात येईल, अशी ग्वाही देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्यातील आणि जगभरातील शिवप्रेमींना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे युगपुरुष होते. त्यांच्या दूरदृष्टीतून उभे राहिलेले स्वराज्य आजही सुशासनाची प्रेरणा देते. शिवरायांच्या विचारांवर चालत बलशाली व स्वाभिमानी महाराष्ट्र घडविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

महाराजांनी जलव्यवस्था, अर्थकारण व पर्यावरण रक्षणाच्या संकल्पना चारशे वर्षांपूर्वीच राबवल्या. 'शिवराई' ही चलन व्यवस्था त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यातील गड-किल्ल्यांचे जतन व संवर्धन अधिक वेगाने करण्यात येईल. बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त किल्ले स्वच्छता व जतन मोहीम राबविण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांप्रती महाराजांच्या संवेदनशील धोरणांचा उल्लेख करत बळीराजाला सक्षम करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. स्त्रीसन्मानाची परंपरा जपत 'लाडकी बहीण' योजनेद्वारे महिलांना सक्षम करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जुन्नर तालुका व शिवनेरी किल्ला परिसराच्या विकासाला प्राधान्य देऊन प्रलंबित मागण्या मार्गी लावण्यात येतील, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

### शिवनेरी किल्ला विचार आणि कार्याचे प्रेरणास्थळ : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

श्रीमती पवार म्हणाल्या, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी शिवनेरी किल्ला, ही शिवजन्मभूमी केवळ ऐतिहासिक स्थळ नव्हते, तर ते त्यांच्या विचारांचे आणि कार्याचे प्रेरणास्थळही होते. पवित्र शिवनेरी किल्ल्याविषयी केवळ जिव्हाळाच नव्हता, तर या शिवजन्मभूमीचे सौंदर्य वाढावे, तिचा ऐतिहासिक वारसा जपला जावा आणि भावी पिढ्यांना अभिमानाने दाखवता यावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या पुढाकारातून 'किल्ले शिवनेरी विकास आराखडा' साकार झाला आणि या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला. गेल्या वर्षी युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत किल्ले शिवनेरीचा समावेश झाला आहे. त्यापूर्वीच शिवजन्मभूमी शिवनेरीसह राज्यातील गडकोटांच्या जतन-संवर्धनासाठी त्यांनी निधीची तरतूद केली होती. केवळ शिवनेरी किल्ल्यापुरते मर्यादित न राहता, शिवजन्मभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जुन्नर तालुक्याला पर्यटन तालुका म्हणून विकसित करण्याचा संकल्प त्यांनी ध्यासाने घेतला होता आणि त्या दिशेने ठोस पावले उचलली होती. गेल्या अर्थसंकल्पात आग्रा येथे महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणारे शिवस्मारक उभारण्याचा निर्धार, पानिपत येथे मराठा शौर्य स्मारक तसेच संगमेश्वर येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाचा समावेश आहे, असा संकल्प करण्यात आला होता.

किल्ले रायगड विकास आराखडा व स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ तुळापूर आणि समाधी स्थळ वढू बुद्रुक येथे स्मारकाचे काम अत्यंत वेगाने सुरु असून ही सर्व कामे प्रगतीपथावर आहेत. या प्रत्येक स्मारकातून भावी पिढ्यांना प्रेरणा, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश मिळत राहणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील प्रत्येक घटकाची काळजी घेण्याची शिकवण आपल्याला दिली असून त्याच विचारांवर आणि रयतेचं राज्य' या संकल्पनेवर राज्य सरकार पुढे वाटचाल करीत आहे. शिवछत्रपतींच्या स्वप्नातील सुजलाम सुफलाम, न्याय आणि समृद्ध स्वराज्य घडवण्यासोबतच यापुढेही महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध राहील, असा विश्वास श्रीमती पवार यांनी व्यक्त केला.

### ढिंग-टांग

**अधिकाऱ्यांवर गुप्त नजर**




## मुंबईत भाजपचा महापौर बसल्यानंतरही शिंदेंची मोठी खेळी

### सव्वा वर्षासाठी शिवसेनेला महापौरपद मिळणार!

मुंबई (दै. संध्या)

राज्याचं लक्ष लागलेल्या मुंबई महानगर पालिकेच्या महापौरपदावरून महायुतीत एकमत झालं असून मुंबई महापालिकेत शिंदेंच्या शिवसेनेलाही सव्वा वर्षे महापौरपद मिळणार आहे. सत्तेच्या काळातील 5 वर्षांपैकी कधीही सव्वा वर्षे शिंदेंच्या शिवसेनेचा महापौर मुंबईत असणार आहे. दोन्ही पक्षातील वरिष्ठ नेत्यांमध्ये एकमत झाल्यानंतर महापौरपदासाठी सव्वा वर्षाचा फॉर्म्युला निश्चित झाल्याची सूत्रांची माहिती आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे (Eknath Shinde) यांच्यात 29 जानेवारी रोजी बैठक पार पडल्यानंतर हा फॉर्म्युला फिक्स झाल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे, भाजपच्या महापौरांना पायउतार व्हावं लागून शिंदेंच्या शिवसेनेचा महौपार सव्वा वर्षासाठी विराजमान होईल. मात्र, तो नगरसेवक कोण असेल हे तेव्हाच समजणार आहे.



राज्याचं लक्ष लागलेल्या मुंबई महापालिकेत यंदा प्रथमच भाजपने सर्वाधिक जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष होण्याचा बहुमान पटकावला. मुंबई महापालिका आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी ठाकरे बंधू एकत्र आले होते. मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे पक्षाने युती करत मुंबई महापालिकेची निवडणूक लढवली. मात्र, युतीला बहुमत मिळवण्यात अपयश आलं. तर, राज ठाकरेंच्या मनसेला केवळ 6 जागा जिंकता आल्या. भाजपने 89 जागा जिंकल्या तर, शिंदेंच्या शिवसेनेनं 29 जागा जिंकत महायुतीने बहुमताचा आकडा गाठल्याने भाजप महायुतीची सत्ता महापालिकेत स्थापन झाली. मात्र, महापौरपदाची मागणी शिवसेनेकडून होत असल्याने महापौर निवडीला उशीर होत होता. अखेर, दोन्ही पक्षाच्या प्रमुखांनी शिवसेनेसाठी सव्वा वर्षाचं महापौरपद निश्चित केल्याची माहिती आहे.

मुंबई आणि इतर महानगरपालिकेत महायुतीचा तिढा सुटत नसल्याने वरिष्ठ नेत्यांमध्ये बैठक पार पडली आणि मुंबईसह इतर महानगर पालिकेचा तिढा सुटला. याच बैठकीत मुंबई महानगर पालिकेत सव्वा वर्षावर महापौरपदाचे वाटप करण्यावर दोन्ही पक्षात एकमत झाल्याची माहिती आहे. सोबतच समितीच्या अध्यक्षपदांचा देखील फॉर्म्युला ठरला. महायुतीमध्ये समन्वय राहावा यासाठी दोन्ही पक्षाच्या समंजसपणाच्या भूमिकेतून हा निर्णय घेण्यात आला.

मुंबई महानगरपालिकेच्या वॉर्ड क्रमांक 132 मधून विजयी झालेल्या भाजप नगरसेविका रितू तावडे यांना भाजपने महापौरपदाची संधी दिली. महानगरपालिकेत भाजप (BJP) आणि शिवसेना युतीने 114 हा बहुमताचा आकडा गाठल्याने महायुतीच्या रितू तावडे महापौर बनल्या आहेत. मुंबईचे महापौरपद सर्वसाधारण महिला गटासाठी राखीव झाल्यानंतर मुंबईची महापौर कोण होणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. या शर्यतीमध्ये तेजस्वी घोसाळकर, शीतल गंभीर आणि रितू तावडे यांचा समावेश होता. मात्र, अखेरच्या क्षणी रितू तावडे यांनी या शर्यतीमध्ये बाजी मारली. मात्र, आता त्यांचं हे पद 5 वर्षातील सत्ता काळात सव्वा वर्षासाठी त्यांना सोडावं लागणार आहे.

## धनंजय मुंडेंच्या अडचणी वाढण्याची शक्यता

### मनोज जरांगेंचा आणखी एक आरोप

बीड (दै. संध्या)

मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना एक गंभीर प्रकरण उघड केल्याचा दावा केला आहे. रंजना नागपूरकर या महिलेने केलेल्या आरोपांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, त्यांच्या पती प्रदीप नागपूरकर हे पोलिस दलात कार्यरत होते. एका प्रकरणाचा निकाल अनुकूल लावून देण्यासाठी धनंजय मुंडे यांना 17 लाख रुपये देण्यात आल्याचा आरोप संबंधित महिलेने केला आहे. मात्र पैसे देऊनही अपेक्षित काम झाले नाही, असे त्यांनी म्हटले आहे. जरांगे पाटील यांच्या म्हणण्यानुसार, या आर्थिक व्यवहारामुळे आणि कामाच्या अनिश्चिततेमुळे नागपूरकर कुटुंबावर मोठा मानसिक ताण निर्माण झाला. रंजना नागपूरकर यांनी असा दावा केला आहे की, या प्रचंड मानसिक दबावाखालीच त्यांच्या पतीचा मृत्यू झाला. या घटनेमुळे त्या पूर्णपणे कोलमडून गेल्या असून न्याय मिळावा म्हणून त्यांनी आपली व्यथा मांडली आहे, असे जरांगे यांनी सांगितले. त्यांनी या प्रकरणाची सखोल



चौकशी व्हावी, अशी मागणीही केली. या आरोपांदरम्यान जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही उल्लेख केला. देवेंद्रजी, कदाचित तुम्हाला ही बाब माहिती नसेल; पण हा प्रकार तुमच्याच जवळच्या नातेवाईकांशी संबंधित आहे, असे ते म्हणाले. भाजपच्या ज्येष्ठ नेत्या शोभा फडणवीस यांच्या बहिणीची मुलगी नागपूरकर यांच्या घरी दिलेली असल्याचा उल्लेख त्यांनी केला. त्यामुळे हे प्रकरण तुमच्या जवळच्या पाहुण्यांशी संबंधित आहे, असे सांगत त्यांनी सरकारने संवेदनशीलतेने लक्ष घालावे, असे आवाहन केले. जरांगे पाटील यांनी पुढे सांगितले की, रंजना नागपूरकर त्यांच्याकडे भेटीसाठी आल्या होत्या. त्या अत्यंत व्यथित अवस्थेत होत्या आणि रडत होत्या, असे त्यांनी सांगितले.

### ब्रेकिंग न्यूज



## विवाह सोहळ्यातच दोन गटात जोरदार वाद

धुळे(दै. संध्या) : धुळे जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. साक्री तालुक्यातील पिंपळनेर गावात विवाह समारंभावेळी दोन गटात जोरदार वाद झाल्याची घटना घडली आहे. या वादातून धारदार शस्त्राने वार केल्याने तीन जणांचा मृत्यू झाला असून दोन ते तीन जण गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. आज दुपारच्या सुमारास ही घटना घडली आहे. साक्री तालुक्यातील पिंपळनेर येथे एका विवाह समारंभ प्रसंगी दोन गटात वाद झाल्याची घटना आज दुपारच्या सुमारास घडली आहे. या वादात धारदार शस्त्राने वार केल्याने तीन जणांचा मृत्यू झाला असून दोन ते तीन जण गंभीर जखमी झाल्याची देखील माहिती समोर येत आहे. या घटनेत सोनू गोसावी, देवेंद्र पवार यांचा जागीच मृत्यू झाला असून, साई गोसावी यांचा धुळ्यात खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. याप्रकरणी सोनगड येथील दोन संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून याप्रकरणी पिंपळनेर गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे.

# साताऱ्यात महायुती म्हणून पुढं जाऊ पण आम्हाला सर्व पर्याय खुले

### गरज पडल्यास चमत्कार करु, जयकुमार गोरेंचं सूचक वक्तव्य

सोलापूर (दै. संध्या)

सातारा जिल्हा परिषदेमध्ये भाजपचे सर्वात जास्त 27 सदस्य निवडून आले आहेत. एक अपक्ष आमच्या सोबत आलेला आहे, असं जयकुमार गोरे यांनी म्हटलं. सातारा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष भाजपाचाच होईल यासाठी आमचे प्रयत्न सुरू असून याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वरिष्ठ स्तरावर बोलत आहेत. साताऱ्यात महायुती म्हणून पुढे जाऊ मात्र तसे न घडल्यास चमत्कार करायची इच्छा नाही पण वेळ पडल्यास चमत्कार करून दाखवावा लागेल असे उत्तर सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले आहे. साताऱ्यात भाजपाला बाजूला ठेवून शिवसेनेचे मंत्री शंभूराज देसाई आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री मकरंद पाटील यांनी जिल्हा परिषदेमध्ये सत्ता स्थापनेसाठी हालचाली सुरू केल्या आहेत. याबाबत आज जयकुमार गोरे यांनी बोलताना सातारा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष भाजपाचा करण्यासाठी आमच्यासमोर देखील सर्व पर्याय खुले आहेत असे सांगितले आहे. महायुती म्हणून पुढे जाऊ मात्र असे न घडल्यास चमत्कार करून दाखवू असे थेट संकेत गोरे यांनी दिल्याने आता सातारा जिल्हा परिषदेमध्ये महायुती अंतर्गत कुरघोड्याचे राजकारण अजून रंगणार आहे. मंत्री मकरंद पाटील, मंत्री शंभूराज देसाई यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांची मुंबईतील नंदनवन बंगल्यावर दोन दिवसांपूर्वी भेट घेतली असल्याची माहिती आहे. साताऱ्यात सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग आला



असून मंत्री देसाई आणि मकरंद पाटील यांनी जिल्हा परिषदेच्या सत्ता स्थापनेच्या संदर्भात भेट घेतली असल्याची माहिती आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून जिल्हा परिषदेवर सत्ता स्थापन करण्यासाठी ग्रीन सिग्नल देण्यात आल्याची माहिती आहे. साताऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना सत्ता स्थापन करणार अशी माहिती खात्रीशीर सूत्रांकडून देण्यात आली आहे. शिवसेना, राष्ट्रवादी यांच्या दाराआडच्या बैठका आणि नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य आऊट ऑफ कव्हरेज असल्यामुळे सातारा जिल्हा परिषदेच्या सत्ता संघर्षाने राज्याचे लक्ष साताऱ्याकडे वेधलं आहे. दरम्यान, भाजपनं सातारा जिल्हा परिषदेची निवडणूक स्वबळावर लढवली होती. भाजपचे साताऱ्यात स्वबळावर सत्ता स्थापन करण्याचे प्रयत्न होते. मात्र, भाजपला 27 जागांपर्यंत मजल मारता आली.

# संपादकीय

## संघर्ष आणि संवादातूनच भारतात रुजलेल्या समतेची कहाणी

'भारतीय गणराज्याचा स्वधर्म' या विषयावरील लेखमालिकेतील पहिल्या लेखात आपण सर्वधर्मसमभाव म्हणजेच सेक्युलरवादाची चर्चा केली. या दुसऱ्या लेखात समता किंवा समाजवाद या दुसऱ्या सूत्राचा विचार करू. समता हा एक आधुनिक विचार आहे. सर्व माणसे समान आहेत हा विचार नवा नाही; परंतु सर्व माणसे समान आहेत म्हणून सर्वांना सारखा सन्मान आणि संसाधने लाभली पाहिजेत ही विचारसरणी मात्र जगाला नवी आहे. समता हाच विचार केंद्रस्थानी ठेवून एक नवी सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याची कल्पना तर पूर्णत: नवीन आहे. १९व्या शतकात युरोपात उमललेली समाजवादी विचारधारा आणि विसाव्या शतकातील बोल्शेविक क्रांती यांच्या प्रभावामुळे समतेचा हा विचार भारतात आला. त्यामुळे बऱ्याचदा, समतेची भावना भारतीय जनमानसाला अनोळखी आणि अस्वीकार्य असल्याचा समज पसरतो. सगळ्या जगाचाच इतिहास हा एक प्रकारे विषमता आणि अन्याय यांचाच इतिहास. परंतु, भारतीय समाजात जातीय विषमता हे एक वेगळेच वास्तव आहे. त्यामुळे अन्य व्यवस्थांच्या तुलनेत भारतीय समाजव्यवस्था दोन बाबतीत वेगळी ठरते. जातिव्यवस्था विषमतेला संस्थात्मक संरचनेची स्थिर चौकट देते आणि या विषमतेवर हिंदू धार्मिक ग्रंथ घट्ट वैचारिक आणि धार्मिक पेहराव चढवतात. पण म्हणून विषमता हाच भारताचा स्वधर्म आहे, असे म्हणणे घाईघाईचे ठरेल. एखाद्या व्यवस्थेचे अस्तित्व हा काही ती व्यवस्था त्या समाजाचा आदर्श असल्याचा पुरावा नव्हे. भारताचा स्वधर्म धर्मशास्त्रे किंवा राजेरजवाडे यांच्या मर्जीवर कधीच अवलंबून नव्हता. बौद्ध दर्शन, सूफी-भक्ती परंपरा आणि राष्ट्रीय आंदोलनांसारख्या वेगवेगळ्या आंदोलनांतून हे स्पष्टपणे प्रतीत झाले. या तिन्ही मोठ्या आंदोलनांनी जातिव्यवस्था एका सुरात नाकारली. समतेच्या विचाराचा प्रसार आणि त्याच्या विशिष्ट भारतीय रूपाच्या मागे केवळ विदेशी प्रभाव होता, असे मुळीच मानता येणार नाही. संघर्ष आणि संवाद याद्वारेच या विचारसरणीने भारतीय जनमानसात आपले स्थान पक्के केले. करुणा ही या सर्वांच्या मुळाशी असलेली संकल्पना होय. करुणा म्हणजे दुसऱ्याचे दुःख पाहून आपले हृदय हेलावून जाणे. प्राणिमात्रांपैकी कोणीही, कुठेही दुःखी असेल तर ते दुःख नष्ट करण्याची तीव्र इच्छा म्हणजे करुणा. करुणेच्या या मूळ संकल्पनेतच, सद्यकालीन समाजवादातील सर्व विचारांचे बीज आहे. सच्ची करुणा ही दुःख निवारण्यासाठी केलेल्या व्यक्तिगत प्रयत्नांपुरती मर्यादित राहूच शकत नाही. समाजाला व्यापून राहिलेल्या दुःखाच्या मुळाशी असलेली संरचनात्मक कारणे विचारात घ्यावीच लागतील; आणि दुःख निवारणासाठी मूलगामी संस्थात्मक परिवर्तनाची मागणीही करावी लागेल. सूफी आणि भक्ती चळवळीने समतेच्या विचाराला एक नवे परिमाण दिले. ईश्वराच्या दयेमुळेच या विश्वाची निर्मिती झाली असेल तर आपल्याला इथल्या सर्व प्राणिमात्रांबद्दल दयाबुद्धी बाळगलीच पाहिजे. माणसाने अन्य माणसांची सेवा करावी, सर्वांवर प्रेम करावे हाच याचा सामाजिक संदर्भातील अर्थ ठरतो. दया हाच न्यायाचा आधार असतो. भक्ती चळवळीतील संतांनी आपल्या स्वतःच्या ढंगाने आणि बऱ्याचदा सूफी संतांच्या साथीने समतेचा संस्कार बिंबवला. सामाजिक आणि आर्थिक विषमतेला थेट आव्हान देण्याऐवजी त्यांनी तिच्यावर तत्त्वज्ञान आणि अध्यात्म यांच्या आधारे प्रहार केला. कबीर, रविदास, तुकाराम आणि बसवण्णा यांच्यासारख्या संतांनी जातिव्यवस्थेतील श्रेष्ठ-कनिष्ठतेवर थेट घाव घातला. परंतु, असे न करणाऱ्या संतांनीही समतेचाच संस्कार समाजात दृढ केला. एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात स्वधर्माच्या या पैलूची नव्याने व्याख्या करण्याचे प्रयत्न दोन प्रकारे झाले.

## संस्कृत सुभाषित

चलेषु स्वामिचित्तेषु सुलभे पिशुने जने।
यदि जीवन्त्य हो चित्रं क्षणमप्युपजीविन:।।

अर्थ : स्वामी चंचल वृत्तीचा आणि भोवती दुष्टांचा सुकाळ अशा परिस्थितीत सेवक क्षणभर जिवंत राहिला तरी केवढे आश्चर्य!

## गुरु वचन

### मानवास हावरटपणा मारक

प्रत्येक व्यक्तीने आपल्या क्षमतांचे निरीक्षण केले पाहिजे व हावरटपणाविषयी नेहमी सावध राहिले पाहिजे. जे हावरट असतात ते आपली भूक, झोप इत्यादी सर्व गमावून बसतात. इच्छा नियमित केल्यामुळे आरोग्य सुदृढ राखण्यात मदत होते व जीवन नैसर्गिक नियमांनुसार चालते. हे नियम किंवा शिस्त म्हणजे इच्छा दाबणे नसून आपल्या क्षमतेनुसार समतोल रोखणे आहे. जास्त खाणे, झोपणे, जागरण आरोग्यासाठी हानिकारक आहे. असे केल्यामुळे शरीरातील विविध यंत्रणा बिघडतात व जीवनाचा उद्देश्यच नष्ट होतो. यामुळे मेंदू क्षीण होतो, हीनभावना निर्माण होते व आत्मविश्वास नष्ट होतो. क्रोध दूसरा नकारात्मक संवेग आहे जो चार मुळ प्रवृत्तीतून निर्माण होतो. जेव्हा एखाद्याची इच्छा पुर्ण होत नाही तेव्हा त्याचे उद्विग्न होते व त्यातून संताप निर्माण होतो म्हणून व्यक्तीने संताप कसा नियंत्रित करावा? हे जाणले पाहिजे.

सर्वप्रथम व्यक्तीने हे लक्षात घेतले पाहिजे की, कुठली इच्छा त्याच्या विकासात सहायक आहे किंवा मारक आहे. जर बुद्धीला शिस्त लावली तर या कामात मदत मिळेल. जर एखाद्या व्यक्तीने ही योग्यता आपल्यात विकसित केली तर राग आल्यानंतर तो स्वत: विषण करेल की, तो का चिडला व त्याची कुठली इच्छा पुर्ण झाली नाही. असे करुन त्यास आपल्या रागाचे कारण समजू शकेल.

## उपदेशकथा

### अहंभाव

एके दिवशी भोजराजा आपल्या निवडक मित्रांना घेऊन क्रीडोद्यानाकडे निघाला. वाटेतही अर्थातच काव्यासंबंधीच्या चर्चा चाललेल्या होत्या. एवढ्यात रस्त्यात एक तपस्वी त्यांना सामोरा आला. भक्तीभावाने राजाने हात जोडले व तो म्हणाला, महाराज आपल्यासारख्या तपस्वीजनाचं दर्शन केवळ भाग्यवंतांनाच होतं. पण आपलं निवासस्थान कोणतं? भोजनाची आपण काय व्यवस्था करता? राजाच्या या प्रश्नावर तपस्व्याने स्मित केले व म्हणाला, राजा, वन हेच माझं निवासस्थान, तिथं वृक्षांची सुमधुर फळं विनासायास मिळतात. जागोजागी नद्यांचं शीतल व मधुर पाणी असतं. सुंदर लतापल्लवांनी बनलेली सुकोमल शय्या असते. कोणत्याच गोष्टीची कोणाकडेच याचना करावी लागत नाही. राजा तपस्व्याचे ते अमृततुल्य बोल ऐकतच राहिला. तेव्हा राजा, आम्ही कोणाचीच कशासाठीही याचना करीत नाही आणि कोणाकडूनच काहीही घेत नाही. त्या तपस्व्याने शांतपणे सांगितले. ते ऐकून राजाने तर त्या तपस्व्याच्या चरणांवर लोटांगण घातले. महाराज, मी अनेकांना आश्रय देतो, अनेकांच्या इच्छा पूर्ण करतो. हा अहंकार माझ्या मनात मूळ धरण्यापूर्वीच तुम्ही खुंटून टाकलात. तुमच्या या कृपेचं ऋण मला जन्मोजन्मी फेडता येणार नाही. राजा भक्तीभावाने त्यांच्या चरणांवर डोके ठेवून म्हणाला.

कथा उपदेश : अहंकाराचे ना गर्वाचे घर कधी ना कधी खाली होतेच. याकरीता अंगी नम्रता बाळगावी.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | २०:०७:११ |
| २० फेब्रुवारी २०२५ | योग:साध्य १८:२२:४७ |
| शुक्रवार | करण:गर १४:३८:४० |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:वणिज |
| फाल्गुन शके | २५:५१:४७+ |
| संवत्– १९४७ | सूर्य:कुम्भ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | चन्द्र:मीन |
| अयन– दक्षिणायण | हिजरी सन् – १४४६ |
| मास– फाल्गुन | मुस्लिम मास – रमजान |
| ऋतु – सौर शिशिर | तारीख – २ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:तृतीया १४:३८:४० | अप्पा महाराज |
| नक्षत्र:उत्तराभाद्रपद | पुण्यतिथी – जळगाव |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८६५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | 6 | | 1 | 2 | | |
| | | 1 | | | 8 | 3 | | 6 |
| | | | | 9 | | 5 | 1 | 7 |
| | 7 | | | | 9 | 6 | | 1 |
| | 6 | | | | | | 7 | |
| 3 | | 9 | 7 | | | | 2 | |
| 1 | 2 | 3 | | 4 | | | | |
| 9 | | 8 | 3 | | | 4 | | |
| | | 6 | 5 | | 2 | | 3 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८६४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 3 | 5 | 2 | 9 | 7 | 6 | 1 | 4 |
| 4 | 7 | 6 | 1 | 3 | 8 | 5 | 9 | 2 |
| 1 | 9 | 2 | 4 | 6 | 5 | 7 | 8 | 3 |
| 3 | 6 | 8 | 7 | 5 | 9 | 2 | 4 | 1 |
| 9 | 2 | 1 | 3 | 4 | 6 | 8 | 5 | 7 |
| 7 | 5 | 4 | 8 | 1 | 2 | 9 | 3 | 6 |
| 2 | 1 | 9 | 5 | 7 | 4 | 3 | 6 | 8 |
| 5 | 4 | 7 | 6 | 8 | 3 | 1 | 2 | 9 |
| 6 | 8 | 3 | 9 | 2 | 1 | 4 | 7 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४७२ – शेटलंड व ओर्कने हे द्वीपसमूह स्कॉटलंडने बळकावले.
- १८३५ – तीव्र भूकंपात चिलीतील कन्सेप्शन हे गाव नेस्तनाबूद.
- १९१३ – ऑस्ट्रेलियाची राजधानी कॅनबेराची स्थापना.

### राष्ट्रीय

- १९४७ – लॉर्ड माऊंटबेटन यांची भारताचे अंतिम वायसराए म्हणून नियुक्ती.
- २००८ – केंद्रीय हज कमिटीचे सदस्य हाफिज नौशाद आझमी यांनी एका प्रसिद्धीपत्रकात पंतप्रधान मनमोहनसिंग यांना कमेटीला आयोगाचा दर्जा देणे व हज यात्रासाठी आंतरराष्ट्रीय निविदा जारी करण्याचा अधिकार सोपण्याची मागणी केली.

### जन्म

- १९०१ – मोहम्मद नाग्विब, ईजिप्तचे राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.
- १९०२ – ऍन्सेल ऍडम्स, अमेरिकन छायाचित्रकार यांचा जन्म.
- १९०४ – अलेक्सेइ कोसिजिन, रशियन राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.
- १९२३ – फोर्ब्स बर्नहॅम, गुयानाचे राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.
- १९२७ – सिडनी पोईटिये, अमेरिकन अभिनेता यांचा जन्म.

### निधन

- ७०२ – चान बाह्लुम दुसरा, मेक्सिकोतील पालेन्क या माया राज्याचा राजा यांचे निधन.
- ११९४ – टॅन्क्रेड, सिसिलीचे राजा यांचे निधन.
- १२५८ – अल मुस्तसिम, बगदादचे खलिफा यांचे निधन.
- १४३१ – पोप मार्टिन पाचवा यांचे निधन.
- १५१३ – क्रिस्चियन दुसरा, डेन्मार्कचे राजा यांचे निधन.

## : SMS :

Father ; Itne kam marks...
Do thappad marne chahiye..
Pappu : Haan papa chalo maine us saale master ka ghar bhi dekh rakha hai...

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २८.९ | २०.६ |
| अहमदनगर | २८ | १९.८ |
| अकोला | ३२ | २१.२ |
| अमरावती | ३०.६ | १९.६ |
| बीड | ३२.८ | १८.१ |
| भंडारा | ३१.५ | १७.३ |
| बुलढाणा | २२.५ | १५ |
| चंद्रपूर | ३२.४ | १८ |
| चेन्नई | ३०.८ | १९.६ |
| नवी दिल्ली | २३.९ | १५.९ |
| धुळे | ३२.३ | २३ |
| गोंदिया | ३०.१ | १६.८ |
| जळगाव | ३२.३ | २२.१ |
| कोल्हापूर | ३०.३ | १८.२ |
| लातूर | २९.६ | १८.६ |
| मुंबई | २९ | २३.६ |
| नागपूर | ३०.६ | १७ |
| नांदेड | ३०.९ | १९.४ |
| नंदूरबार | २९.६ | २२.३ |
| नाशिक | २९.४ | १७.५ |
| पुणे | २८.७ | १८.७ |
| पंढरपूर | २९.९ | २०.७ |
| सातारा | २९.९ | १७.७ |
| सांगली | ३०.८ | १८.७ |
| सोलापूर | ३०.२ | २०.७ |
| वर्धा | ३१.८ | १९.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग :हिरवा, शुभ दिशा :दक्षिण प्रसन्नतेमुळे आपल्या कामाचे सार्थक होईल. भेटवस्तू मिळण्याची शक्यता आहे.

**तुळ :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पश्चिम पराक्रमामुळे आपल्याला यश मिळेल. स्तुतीपासून दूर रहा.

**वृषभ :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा:पूर्व कौटुंबिक जीवन आनंददायी राहील. पूर्वी केलेल्या कामाचे परिणाम चांगले दिसून येण्यास सुरूवात होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम रोजगारात परिवर्तन होण्याची शक्यता आहे. जोखमीच्या कामापासून दूर रहा.

**मिथुन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व विनयशिल राहून प्रत्येक कामात यश मिळणार आहे. आकर्षक प्रस्ताव मिळतील फायदा घ्या.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा :पूर्व कौटुंबिक समस्या निर्माण होतील. देण्या घेण्याच्या व्यवहारात सर्तकता बाळगा. व्यापार मध्यम राहील.

**कर्क :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर गृहपयोगी वस्तू खरेदी कराल. दूरदर्शीपणा ठेवून कार्य करा. व्यापारातील हेतु साध्य होतील.

**मकर :** शुभ रंग :हिरवा, शुभ दिशा:पश्चिम स्वत:ची योग्यता समजून घेतली तरच आपण समाजात प्रतिष्ठा संपादन करू शकाल.


**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम आधिकारी वर्ग आपल्या कामाची स्तुती करतील. बौद्धीक पातळीत वाढ होईल.

**कुंभ :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम साहस पराक्रमात वाढ होईल. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील. थंडीचे आजार जाणवतील.

**कन्या :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: दक्षिण अडचणींचा सामना करून आपण आपले ध्येय साध्य करू शकता. व्यापार फायदेशीर राहण्याचा योग आहे.

**मीन :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर दिवस चांगला जाणार असला तरी आर्थिक तंगी राहणार आहे. मुलांच्या कामामुळे दु:खी रहाल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८६५



### आडवे शब्द

१. गणपतीच्या रूपाचे आरतीमधील वर्णन
७. छोटी लढाई
१०. समूह, जथा
११. नड
१२. त्रासदायक
१४. चिखलाची जमीन
१६. डोळ्यात पाणी आणणारा कंद
१७. बेचव
१९. हिंदीत वागण्यचे वळण
२०. भांडणे सोडविणारा मध्यस्थ
२१. पोरका
२२. बाळभाषेत ईश्वर
२३. आईवडिलांचे छत्र असलेला
२४. कमळ
२५. युवक
२७. किंमत
२८. हुक्की, लहर
२९. कहाणी
३०. दुर्दशा
३२. उत्कर्षाचा काळ
३५. सांघिक व्यायाम
३७. मान देण्यास योग्य असा
३९. सापाची एक जात
४०. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा
४२. आठवण
४३. रामाला बोरे देणारी
४४. सारखा
४६. आई
४८. रामचरित मानस लिहिणारे हिंदी संत
५०. साग्रसंगीत भोजनाची खाशी पंगत
५३. किंमत, ५५. मूल
५७. उणीव भरून काढणारी
५८. छोटासा
६१. पिकाचा पावसाळी हंगाम
६२. सुगंध
६३. रियाझ
६४. हाताचा उपडा पंजा
६५. सरोवर
६६. ठाणवई
६७. प्रजा
६८. 'माई' जोडल्यास विठ्ठलपत्नीचे नाव
७०. कोणत्याही क्षेत्रातील प्रतिभावंत
७२. मांडणी करणे, एकावर एक ठेवणे
७४. वर्दळ
७५. पांढरशुभ्र (हिंदी)
७८. खांद्यावरून घ्यायचे वस्त्र
७९. कठीण प्रसंग
८०. होडके, नावाडी

### उभे शब्द

२. डोंगर खोदून केलेला रस्ता
३. प्रत्येक, ४. चंद्र
५. किंचित तांबड्या रंगाचे
६. गोष्ट फुगवून सांगणे (वाक्प्रचार)
७. स्वच्छ, चमकणारे
८. मोगऱ्याची मोठ्या पाकळ्यांची जात
९. झोक, वळण
१०. एकमेकांवर काम ढकलणे, चुकवाचुकव
१३. अस्थिर संपत्ती
१५. पाकळी, तुकडी
१६. बायको
१८. पौराणिक अश्ववाहन
२१. अगम्य
२३. उत्सव
२४. कारण
२६. तात्पुरते रुसणे
२७. भारताचा राष्ट्रीय पक्षी
२८. मानसिक धक्का (हिंदी)
३०. पाडाव, पडणे
३१. खराब, वाईट
३३. घोडा
३४. मुद्यावरून गुद्यावर येणे
३६. संगीतातील एक राग
३८. अनावश्यक
४१. अत्तरासाठी प्रसिद्ध उत्तर प्रदेशातील शहर
४४. नेहमी
४५. नमुनेदार
४६. सरकारी जमिनीची व्यवस्था पाहणारा
४७. अपघात, दुर्दैवी प्रसंग (हिंदी)
४९. लवकुशाची आई
५०. पुराणकालीन पर्वत, दंड लावल्यास पाठीचा कणा
५१. चंचल, बेशिस्त
५२. शांतता
५४. प्रमाणपत्र, उदाहरण
५६. सत्व
५९. चर, खंदक
६०. नवारीने बाज विणणे
६२. फुल, पुष्प
६३. एकरूपता
६५. बोबडी वळणे
६९. उंचीने कमी
७१. तमाशातील ठसकेबाज नृत्यगीत
७३. ओरखडा
७४अ. कर्ता विचारणारा प्रश्न
७६. रिंगण
७७. औषध

### जम्बो शब्दकोडे क्र. ८६४ चे उत्तर

आडवे उत्तर : १.जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे ६.घरजावई १०.वळ ११.कानस १२.साप १३.गोधन १५.डावरा १७.सदा १८.कानकोरणी २०.सोपान २२.विराट २३.ठाण २४.पडळ २५.करपट २६.उपकार २९.कावड ३०.मबलक ३३.रया ३४.पल ३५.अड्डी ३६.काठपदर ३८.वरधावा ४०.सव ४२.पोक ४३.नखरूड ४५.घसरगुंडी ४९.जहाज ५१.रमाधाम ५१अ.रन ५२.डर ५३.गारवा ५५.रकाना ५७.जव ५९.कसारा ६०.सह ६२.तटबंदी ६५.माणूसघाणा ६७.देठ ६९.रचना ७०.धनवान ७२.उणे दुणे काढणे ७४.कवार ७५.पवन ७७.सब ७९.चौरस ८१.गरीब ८४.पळस ८६.तानसेन ८८.देहाची तिजोरी भक्तीचाच ठेवा ९१.सरा ९२अ.फटका ९३.पटू ९५.नारळपाक ९६.कळकळ ९७.अप्रतीम

उभे उत्तर : १.जावई २.वेळ ३.वंदन ४.तेरडा ५.कचरा ६.घनदाट ७.रस ८.वजन ९.पापणी ११.कासरा १२.सारण १३.गोपाळ १४.धन १६.वशाट १८.कालपरवा १९.कोठार २०.सोडचिठ्ठी २१.खरडपट्टी २२.विलंब २५.कवठ २७.काया २८.घोलवड २९.काका ३१.लवकर ३२.कर ३४.पसरून ३५.अवघड ३७.रत्नहार ३९.धावधाव ४१.घोर ४४.खरवस ४६.सरकवणे ४७.गुंगारा देणे ४८.डीर ५०.जकातनाका ५४.वास ५६.नाट ५७.जणू ५८.खुणा ६१.हरणे ६३.बंधक ६४.दीनवाणा ६५.मान ६६.घावन ६८.ठकास महाठक ७१.वार ७२.उबग ७३.दुआब ७३अ.ढब ७५.परतावा ७६.वसन ७८.मळभ ८०.कान ८२.रीतसर ८३.अतिशय ८४.परीक्षक ८५.सक्ती ८५अ.लोचट ८७.सेनापती ८९.चाफळ ९०.ठेका ९२.राळ ९४.टूम

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### व्यसनाचा अफजल विचारांच्या वाराने पराभूत व्हावा; शिवजयंती भव्य मिरवणूक सोहळा

पुणे (दैनिक संध्या) : व्यसनरूपी राक्षसावर शिवविचारांचा प्रहार करूया... सुसंकृत स्वराज्यासाठी व्यसनमुक्त समाज घडवूया... व्यसनाचा अफजल पराभूत होईल विचारांच्या वाराने, उज्वल भविष्य घडेल शिवशक्तीच्या आधाराने... असे फलक यंदा सरसेनापती हंबीरराव मोहिते स्वराज्यरथ सोहळ्यात झळकले. शिवरायांच्या स्वप्नातील स्वराज्य घडविताना व्यसनाधीनतेच्या राक्षसाला शिवविचारांनी फाडण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. सरसेनापती हंबीरराव मोहिते स्वराज्य रथ समिती, पुणे तर्फे फरासखाना समोर रथाचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पोलीस उपायुक्त कृष्णकांत पिंगळे, बेळगावचे महापौर मंगेश पवार, डॉ. मिलिंद भोई, नगरसेविका स्वप्नाली पंडित यांसह सरदार पवार घराणे, सरदार पायगुडे घराण्यातील सदस्य उपस्थित होते. समितीचे जयाजी मोहिते, ॲड. सुभाष मोहिते, शिरीष मोहिते, दत्ता मोहिते, संदीप मोहिते, प्रशांत मोहिते, विक्रांत मोहिते, रोहन मोहिते, सागर मोहिते, प्रकाश मोहिते, दिनेश मोहिते, रामेश्वर मोहिते आदींनी संयोजन केले. शिवरायांच्या स्वराज्याला व्यसनमुक्त सुसंस्कृत करूया, असा निर्धार उपस्थितांनी केला.

### कोयता घेऊन भांडण करणाऱ्या तडीपार गुंडाला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

पुणे (दैनिक संध्या) : येरवडा परिसरात कोयता घेऊन भांडण करणाऱ्या तडीपार गुंडासह दोन जणांना लक्ष्मी नगर पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी तत्पर कारवाई करत दोघांना ताब्यात घेतल्याने संभाव्य गंभीर प्रकार टळला. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, येरवड्यातील सरकारमान्य ताडी दुकानासमोर दोन इसम आपापसात भांडत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांना पाहताच दोघांनी घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला; मात्र पोलिसांनी पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले. झडती घेतली असता त्यांच्या जवळ कोयते आढळून आले. या प्रकरणी प्रज्वल उर्फ नवीन जड्याळ (रा. गणेशनगर, येरवडा, पुणे) आणि सचिन सुरेश गवळी यांच्याविरुद्ध लक्ष्मी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौकशीदरम्यान प्रज्वल जड्याळ हा तडीपार गुंड असल्याचे उघड झाले. पोलीस उपायुक्त परिमंडळ-४, पुणे शहर यांच्या आदेशानुसार मुंबई पोलीस अधिनियम कलम ५७ अंतर्गत १७ जुलै २०२५ पासून एका वर्षासाठी त्याला तडीपार करण्यात आले होते. तरीही त्याने कोणतीही अधिकृत परवानगी न घेता पुणे शहरात प्रवेश केल्याचे समोर आले. ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, परिमंडळ-४ चे पोलीस उपायुक्त रजनीकांत चुलुमुला, येरवडा विभागाचे पोलीस उपायुक्त सुनील जैतापूरकर तसेच लक्ष्मी नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजीराव विभुते, पोलीस अंमलदार अक्षय शिंदे, अतुल जाधव, अजित वाघुळे, अनिल शिंदे आणि मनोज शिंदे यांनी ही कारवाई यशस्वीपणे पार पाडली.

### आयपीटेक्स आणि ग्राइंडेक्स 2026 : गिअर व पॉवर ट्रान्समिशन उद्योगाला नवी दिशा

पुणे (दैनिक संध्या) : पॉवर ट्रान्समिशन, प्रिसीजन ग्राइंडिंग आणि गिअर उत्पादन तंत्रज्ञान क्षेत्रातील भारतातील अग्रगण्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शन 'आयपीटेक्स आणि ग्राइंडेक्स २०२६' हे २६ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान पुण्यातील ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित करण्यात येणार आहे. अमेरिकन गिअर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (AGMA) यांच्या पाठबळासह होणाऱ्या या प्रदर्शनाचे उद्घाटन नामवंत औद्योगिक नेत्यांच्या हस्ते होणार आहे. या प्रदर्शनात गिअर कटिंग व ग्राइंडिंग मशिन्स, टूलिंग, मेट्रोलॉजी, फिनिशिंग, ऑटोमेशन आणि कंट्रोल सिस्टीम्स अशा संपूर्ण पॉवर ट्रान्समिशन मूल्यसाखळीतील तंत्रज्ञानाचे सादरीकरण केले जाणार आहे. उद्योगातील उत्पादक, तंत्रज्ञान पुरवठादार आणि तज्ज्ञांना एकत्र आणणारे हे जागतिक व्यासपीठ ठरणार असून, नव्या संधी आणि तांत्रिक देवाणघेवाणीस चालना मिळणार आहे. या संदर्भात व्हर्गो कम्युनिकेशन्स अँड एक्झिबिशन्स प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक रघुनाथ जी. म्हणाले की, आयपीटेक्स आणि ग्राइंडेक्स २०२६ हे गिअर व पॉवर ट्रान्समिशन उद्योगातील सर्व घटकांना एकत्र आणणारे व्यापक व्यासपीठ आहे. उद्योगाला ३६० अंश तांत्रिक दृष्टिकोन देत भारतीय उत्पादन प्रणालींना आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगत करण्यासाठी हे प्रदर्शन महत्त्वपूर्ण ठरेल. या प्रदर्शनामुळे उद्योगक्षेत्रात नव्या तंत्रज्ञानाची ओळख, व्यवसाय संधी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहकार्य वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### शिवरायांनी गिरिदुर्ग, जलदुर्गांसोबत स्वराज्यासाठी लढणारे 'नरदुर्ग' उभारले



■ शिवव्याख्याते प्रा.नितीन बानगुडे पाटील; सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे शिवजयंती निमित्त उत्सवाचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : क्रांतिकारकांनी व महापुरुषांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र वाचले. त्यामुळे त्यांनी क्रांती घडविताना शिवरायांचे विचार लोकांपर्यंत पोहोचविले.पराक्रमाचा एका एका धडा गिरवत शिवरायांनी रयतेत विश्वास निर्माण केला. अनेक राजांनी गिरिदुर्ग, जलदुर्ग बांधले, पण नरदुर्ग उभारणारे केवळ छत्रपती शिवाजी महाराज होते. स्वराज्यासाठी लढणारी आणि मरणारी माणसे त्यांनी घडविली, असे मत इतिहास अभ्यासक, लेखक व शिवव्याख्याते प्रा.नितीन बानगुडे पाटील यांनी व्यक्त केले. सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे शिवजयंती निमित्त उत्सवाचे आयोजन बुधवार पेठेतील कै.श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिरासमोरील जय गणेश प्रांगण येथे करण्यात आले. यामध्ये प्रा.नितीन बानगुडे पाटील यांनी आपले विचार मांडले. प्रा.नितीन बानगुडे पाटील म्हणाले, समुद्रामार्गे येणारे अरबी लोक आपल्या जनतेवर अत्याचार करीत असत. माणसांना गुलाम बनवून व्यापार सुरू होता. छत्रपती शिवाजी महाराजांना याचा संताप होता. त्यामुळे त्यांनी स्वराज्याचा आरमाराला सांगितले की अरबी चाचे जनतेला त्रास देत आहेत, त्यांचा बंदोबस्त करा. ज्यावेळी अरबांची गलबते कोकणात आली, तेव्हा त्यांच्याशी लढा देत मस्कत पर्यंत मराठ्यांचे आरमार गेले. तेथून १७५ अरब कैद करून महाराजांसमोर आणण्यात आले. महाराजांनी वासोटच्या किल्ल्यात म्हणजे व्याघ्रगड येथे कैद करून ठेवत त्यांना शिक्षा दिली. ही महाराजांची दूरदृष्टी होती.

# 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात शिवजयंतीचा जल्लोष

## शिवगर्जना, पालखी मिरवणूक, मर्दानी खेळाद्वारे विद्यार्थांचे शिवरायांना अभिवादन



पुणे (दै. संध्या) :

सनई-चौघड्यांचे मंजुळ स्वर, तुतारीच्या गगनभेदी गर्जना, ढोल-ताशांचा निनाद, भगव्या पताका आणि मर्दानी खेळांसह 'छत्रपती शिवाजी महाराज की जय!', 'जय भवानी, जय शिवराय!' आणि 'नमो पार्वती पते, हर हर महादेव' या घोषणांच्या जयघोषात एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ येथे महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावरील शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या हस्ते हिंदवी स्वराज्याचे प्रतीक असलेला भगवा ध्वज फडकावून जयंती उत्सवाचा प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र लोकसेवा आयोगचे माजी अध्यक्ष डॉ. किशोर राजे निंबाळकर, विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट डॉ.सायली गणकर, प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे, डॉ. नचिकेत ठाकूर, कुलसचिव डॉ. महेश चोपडे आदी मान्यवर उपस्थित होते.

लोणी-काळभोर व कदमवाक वस्ती ग्रामपंचायतीतील नागरिक, विद्यापीठाचे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि शेकडो विद्यार्थ्यांसमोर विद्यार्थ्यांनी शिवरायांवरील कविता, पोवाडे आणि पहाडी आवाजातील शिवगर्जना सादर केल्या. या सादरीकरणामुळे उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः रोमांच उभे राहिले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक नृत्य व मैदानी खेळांची प्रात्यक्षिके सादर केली. शिवरायांच्या पालखीसह मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर अश्वारूढ पुतळ्याला क्रेनद्वारे पुष्पहार अर्पण करून महाराजांची आरती करण्यात आली आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी बोलताना प्रा. डॉ. कराड म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे उर्जेचा प्रचंड मोठा स्रोत आहेत. आयुष्यात कितीही मोठ्या समस्या आणि संकटे आली, तरी शिवचरित्र वाचल्यास त्यावर मार्ग सापडतो. छत्रपती शिवाजी महाराज आपल्यातच आहेत आणि ते आज ३९६ वर्षांचे झाले असल्याची भावना प्रत्येकाच्या मनात आहे. त्यामुळे शिवछत्रपतींचे गुण आत्मसात करण्याचा प्रत्येकाने प्रयत्न करणे हीच खरी शिवजयंती आहे, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

### रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठात आयोजित रक्तदान शिबिर आणि गडकिल्ले बनविण्याच्या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला. रक्तदान शिबिरात तब्बल १७० हून अधिक दात्यांनी रक्तदान केल्याने हे शिबिर अत्यंत यशस्वी ठरले. विद्यापीठाच्या नवीन आयटी इमारतीच्या प्रवेशद्वारावर या दोन्ही उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी रक्तदानासारखे सामाजिक उपक्रम राबवून शिवजयंती साजरी केल्याने परिसरातील नागरिकांकडून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

## जेईई मेन २०२६ मध्ये बाकलीवाल ट्युटोरियल्सचा विक्रमी निकाल

पुणे (दै. संध्या) :

बाकलीवाल ट्युटोरियल्स (BT) यांनी जेईई मेन २०२६ (सेशन १ – जानेवारी) परीक्षेत आतापर्यंतचा सर्वोत्तम निकाल नोंदवत शैक्षणिक नेतृत्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. यंदाचा निकाल उच्च पर्सेंटाइल मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या दृष्टीने विक्रमी ठरला असून ९९.५ पर्सेंटाइलपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या १११ हून अधिक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही पुण्यात ९९, ९९.५ आणि ९९.९+ पर्सेंटाइल मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची सर्वाधिक संख्या BT चीच राहिली असून ती इतर संस्थांपेक्षा मोठ्या फरकाने आघाडीवर आहे. हा निकाल संस्थेची सक्षम शैक्षणिक पद्धती, नियोजित अध्यापन, कठोर टेस्ट सिरीज, वैयक्तिक मार्गदर्शन आणि शिस्तबद्ध अंमलबजावणी यांचे द्योतक मानला जात आहे. निकालातील ठळक बाबी पाहिल्यास ९९.९ पर्सेंटाइलपेक्षा जास्त गुण मिळवणारे २० विद्यार्थी, ९९.५ पर्सेंटाइलपेक्षा जास्त गुण मिळवणारे १११ विद्यार्थी, तर ९९ पर्सेंटाइलपेक्षा जास्त गुण मिळवणारे १९२ विद्यार्थी आहेत. ९९.९५ पर्सेंटाइलचा मानाचा टप्पा पार करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सिद्धार्थ आठल्ये (९९.९८६४), अतेन पंचबुधे (९९.९८५७), अवनीश खोलकर (९९.९७८७), आरुष कुमार (९९.९७७३), आयुष निरंकारी (९९.९७३९), आदित्य ठाकूर (९९.९७३४), रायन आनंद (९९.९६५४) आणि चिन्मय गोखले (९९.९५२८) यांचा समावेश आहे.




## 'राजा शिवाजी'चे पोस्टर रिलीज; रितेश देशमुख महाराजांच्या भूमिकेत

पुणे (दै. संध्या) :

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या औचित्याने जिओ स्टुडिओज प्रस्तुत आणि मुंबई फिल्म कंपनी निर्मित 'राजा शिवाजी' या बहुप्रतीक्षित ऐतिहासिक चित्रपटाचे अधिकृत पोस्टर प्रदर्शित करण्यात आले. दिग्दर्शक रितेश विलासराव देशमुख यांनी स्वतः छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारत हा चित्रपट साकारला आहे.

पोस्टरमध्ये रितेश देशमुख महाराजांच्या वेशात अत्यंत प्रभावी दिसत असून हातात भगवा ध्वज, चेहऱ्यावर करारी भाव आणि युद्धाच्या पार्श्वभूमीतील मांडणी महाराजांच्या शौर्याची प्रचिती देते. सुवर्ण अक्षरांतील शीर्षक आणि प्रकाशयोजनेतून चित्रपटाची भव्यता अधोरेखित होते.

जिओ स्टुडिओज प्रस्तुत आणि मुंबई फिल्म कंपनी निर्मित 'राजा शिवाजी' हा द्विभाषिक (मराठी व हिंदी) ऐतिहासिक ॲक्शन-ड्रामा असून स्वराज्य स्थापनेचा अद्वितीय प्रवास, त्याग, दूरदृष्टी आणि शौर्य यांचा सशक्त सिनेमॅटिक आविष्कार यातून मांडला जाणार आहे.




अन्यायाविरुद्ध लढत स्वराज्याच्या स्थापनेची गाथा या चित्रपटातून उलगडणार आहे. या चित्रपटात मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलाकारांची भक्कम फौज पाहायला मिळणार आहे. संगीत अजय-अतुल यांचे असून प्रसिद्ध छायाचित्रकार संतोष सिवन मराठी चित्रपटसृष्टीत या चित्रपटातून पदार्पण करत आहेत. उत्कृष्ट अभिनय, भव्य दृश्यात्मक मांडणी आणि सांस्कृतिक अभिमानाचा अनुभव देणारी ही कलाकृती ठरणार असल्याचे निर्मात्यांनी सांगितले.

निर्माते ज्योती देशपांडे आणि जिनिलीया रितेश देशमुख यांच्या निर्मितीत, रितेश देशमुख दिग्दर्शित 'राजा शिवाजी' हा चित्रपट १ मे २०२६ रोजी 'महाराष्ट्र दिना'च्या दिवशी जगभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे. स्वराज्याच्या विचारांना नव्या पिढीपर्यंत पोहोचवणारा हा चित्रपट आंतरराष्ट्रीय स्तरावरही गाजण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांनी समाजाला दिलेला विचार, संस्कार नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे आवश्यक

**पुण्याच्या नवनिर्वाचित महापौर मंजुषा नागपुरे यांचे मत : आंबेगाव भागातील नवनिर्वाचित नगरसेवकांचा शिवसृष्टीमध्ये सत्कार**



पुणे (दै. संध्या) :

छत्रपती शिवाजी महाराजांनी समाजाला दिलेला विचार, संस्कार नव्या पिढीपर्यंत पोहचवण्याचे काम अव्यहतपणे सुरु ठेवण्याची आवश्यकता असल्याचे मत पुण्याच्या नवनिर्वाचित महापौर मंजुषा नागपुरे यांनी व्यक्त केले. महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानतर्फे आज आंबेगाव बुद्रुक येथे साकारत असलेल्या शिवसृष्टीमध्ये आज शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली, यावेळी आयोजित एका कार्यक्रमात नागपुरे बोलत होत्या. शिवजयंतीच्या निमित्ताने आंबेगाव भागातील नवनिर्वाचित नगरसेवक नगरसेवक हरिदास चरवड, कोमल नवले, जयश्री भूमकर, लहू लायगुडे, अरुण राजवाडे, संदीप बेलदार, प्रतिभा चोरगे, व्यंकोजी खोपडे, स्मिता कोंढरे, सीमा बेलदरे यांचा आज शिवसृष्टीमध्ये नागपुरे यांच्या हस्ते सत्कारही करण्यात आला. यावेळी शिवसृष्टीचे विश्वस्त अमृत पुरंदरे, विनित कुबेर, मनोज पोचट, मुख्य प्रशासकीय अधिकारी अनिल पवार आदी उपस्थित होते.

लोककल्याण करण्यासाठी आयुष्य वेचलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला खूप काही दिले आहे. त्यामध्ये त्यांचे विचार आणि संस्कार हे खूप महत्वाचे आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांनी दिलेले विचार आणि संस्कार नव्या पिढीपर्यंत अखंडपणे पोहचवण्याचे काम आपल्याला करायचे आहे. विशेष म्हणजे भविष्यकाळामध्ये येणाऱ्या प्रत्येक पिढीने हे काम सुरु ठेवायचे आहे, असे नागपुरे यावेळी म्हणाल्या.

छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन शास्त्र हे उत्तम होते. आताच्या पिढीमध्ये शिक्षण घेत असणारी मुले त्याचा बारकाईने अभ्यास करत आहेत, ही चांगली बाब आहे. त्याचा त्यांना निश्चितपणे फायदा होत असेल, असे नागपुरे यांनी नमूद केले.

आपल्याला शिवसृष्टीमध्ये आल्यावर देवळात आल्यासारखे वाटते. इथे एक वेगळी ऊर्जा मिळते, इतकेच नव्हे तर आपले विचार प्रखरपणे मांडण्याची ऊर्जा मिळते, त्यामुळे इथे सारखे यावेसे वाटत असल्याची भावना नागपुरे यांनी यावेळी व्यक्त केली. विनीत कुबेर यांनी आभार मानेल.

## भव्य पदयात्रा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

पुणे (दै. संध्या) :

भारत सरकारचे युवा कार्यक्रम आणि खेळ मंत्रालय, भारत सरकारच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासन, क्रीडा विभाग आणि पुणे महानगरपालिका यांच्या समन्वयाने शिवजयंती दिनानिमित्त 'मेरा युवा भारत" भव्य पदयात्रेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते झेंडा दाखवून पदयात्रेचा शनिवार वाडा येथून शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपमहापौर परशुराम वाडेकर, क्रीडा उपसंचालक युवराज नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, शिक्षण उपायुक्त वसुंधरा बारवे, मनपा उपायुक्त संदीप खलाटे, जिल्हा प्रशासनाच्या वतीने तहसीलदार स्मिता माने,अर्जुन पुरस्कार प्राप्त काकासाहेब पवार, भारतीय खो खो संघाचे कर्णधार प्रतीक वायकर तसेच शिक्षण, पर्यटन, क्रीडा, आरोग्य व पोलीस विभागाचे अधिकारी उपस्थित होते. महापौर श्रीमती नागपुरे म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आपण अंगीकारले पाहिजेत. शिवजयंती ही औपचारिक मिरवणूक न राहता ती तरुण पिढीला महाराजांच्या विचारांशी जोडणारी, सगळ्यांमध्ये सांघिक भावना निर्माण करणारी ठरावी. आपले सण- परंपरा सर्वांनी एकत्र येऊन साजरे केले पाहिजेत. सर्व महानुभाव, युगपुरुषांच्या जयंती एकत्र येऊन साजरे करुया सर्वांमध्ये सांघिक भावना निर्माण होऊन शिवरायांचे विचार आचरणात यावेत, असा संकल्प यानिमित्ताने करुया, असे त्या म्हणाल्या.



# लक्झरी विभागात फोक्सवॅगनची दमदार झेप

**'टायरॉन आर-लाइन' ४६.९९ लाखांत बाजारात**

पुणे (दै. संध्या) :

जर्मन वाहन निर्माता फोक्सवॅगन ची भारतीय शाखा फोक्सवॅगन इंडियाने प्रीमियम क्रीडोपयोगी वाहन विभागात आपली उपस्थिती अधिक मजबूत करत 'टायरॉन आर-लाइन' या वैविध्यपूर्ण लक्झरी क्रीडोपयोगी वाहनाची घोषणा केली आहे. ४६ लाख ९९ हजार रुपये (कारखाना किंमत) या आकर्षक प्रारंभिक दरात हे वाहन भारतीय बाजारात सादर करण्यात आले आहे.

महत्त्वाकांक्षी आणि सूक्ष्मदर्शी ग्राहकांच्या जीवनशैलीचा विचार करून तयार करण्यात आलेल्या टायरॉन आर-लाइनमध्ये प्रगत रचना, गतिमान कार्यक्षमता, अत्याधुनिक तंत्रसुविधा आणि अपवादात्मक आराम यांचा संगम पाहायला मिळतो. दैनंदिन वापरातील उपयुक्तता जपत उच्च दर्जाचा अनुभव देण्यावर कंपनीने विशेष भर दिला आहे.

आर-लाइनच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीमुळे या मॉडेलला अधिक देखणे आणि प्रभावी रूप प्राप्त झाले आहे. सुधारित अंतर्गत सजावट, उत्कृष्ट दर्जाची फिनिशिंग आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रवासाचा अनुभव अधिक समृद्ध झाला आहे. अचूक रचना, सक्षम कार्यक्षमता आणि अद्वितीय लक्झरी ही फोक्सवॅगन ब्रँडची ओळख असून, त्याच परंपरेचा वारसा टायरॉन आर-लाइन पुढे नेत असल्याचे कंपनीने नमूद केले आहे.



या निमित्ताने मत व्यक्त करत फोक्सवॅगन प्रवासी वाहन विभागाचे ब्रँड संचालक नितीन कोहली म्हणाले, "टायरॉन आर-लाइनमधून महत्त्वाकांक्षी प्रीमियम वाहनांविषयी आमचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. लक्झरीसोबत कार्यक्षमतेला प्राधान्य देणाऱ्या आणि प्रगतीशील मानसिकतेचे प्रतीक असलेले वाहन शोधणाऱ्या ग्राहकांसाठी हे मॉडेल तयार करण्यात आले आहे. जागतिक स्तरावर प्रशंसित आणि कार्यक्षमता-केंद्रित उत्पादने सादर करण्याच्या आमच्या कटिबद्धतेला टायरॉन आर-लाइन अधिक बळकटी देते."

सात आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध असलेले हे वाहन ग्राहकांना त्यांच्या वैयक्तिक अभिरुचीनुसार पर्याय निवडण्याची संधी देते. डॉल्फिन ग्रे धातूछटा, ऑयस्टर सिल्व्हर धातूछटा, अल्ट्राव्हायोलेट धातूछटा, सिप्रेसिनो हिरवी धातूछटा, नाइटशेड निळी धातूछटा, ग्रेनाडिला काळी धातूछटा आणि ओरिक्स पांढरी मोतीसदृश छटा अशा पर्यायांमुळे या मॉडेलची बाजारातील आकर्षकता अधिक वाढली आहे.


प्रीमियम विभागात अधिक महत्त्वाकांक्षी उत्पादनसंच उभारण्याच्या दिशेने टायरॉन आर-लाइन हे महत्त्वाचे पाऊल ठरत असून, भारतीय ग्राहकांसाठी जागतिक रचना, सक्षम कार्यक्षमता आणि लक्झरी यांचे संतुलित मिश्रण देण्याचा कंपनीचा प्रयत्न यामधून अधोरेखित होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## या आठवड्यात मनोरंजनाचा दुहेरी डोस; लोकप्रिय मालिकांमध्ये हाय-व्होल्टेज ड्रामा

पुणे (दैनिक संध्या) : एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय मालिकांमध्ये या आठवड्यात प्रेक्षकांना कॉमेडी, थरार आणि भावनिक घडामोडींचा दुहेरी आनंद अनुभवायला मिळणार आहे. 'घरवाली पेडवाली', 'भाबीजी घर पर है २.०' आणि 'हप्पू की उलटन पलटन' या मालिकांमध्ये नवे ट्विस्ट आणि धक्कादायक उलगडे पाहायला मिळणार आहेत. 'घरवाली पेडवाली'मध्ये पप्पी महिलेच्या वेशात घरातून पळून जातो, तर लट्टू त्याला जादूने पोपट बनवतो. एटीएममधील चोरी, खात्यातून एक लाख रुपये काढल्याचा मेसेज आणि त्यानंतर उडालेला गोंधळ यामुळे कथानक अधिक रंगतदार होते. बोलणारा पोपट कुटुंबासमोर जीतूच्या दोन पत्नी असल्याचे सत्य उघड करताच मालिकेत मोठा ट्विस्ट येतो. 'भाबीजी घर पर है २.०'मध्ये रहस्यमय गुंतवणूकदाराच्या एंट्रीमुळे घुंघटगंज रिसॉर्टमध्ये खळबळ उडते. जादुई 'सी-थ्रू' चष्म्यांमुळे निर्माण होणारे प्रसंग, विभूती-तिवारी यांच्यातील स्पर्धा आणि अंगूरीसमोर घडणाऱ्या विचित्र घटनांमुळे प्रेक्षकांना खळखळून हसू येणार आहे. 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये मुलांच्या एका खोट्या गोष्टीमुळे खरी संकटे ओढवतात. अपहरणाची बनावट कहाणी सांगताना झालेल्या चुकीमुळे प्रत्यक्ष अपहरणाची घटना घडते आणि हप्पू सिंगसमोर मोठे आव्हान उभे राहते. हे विशेष भाग पाहण्यासाठी 'हप्पू की उलटन पलटन' रात्री ९.३० वाजता, 'घरवाली पेडवाली' रात्री १० वाजता आणि 'भाबीजी घर पर है २.०' रात्री १०.३० वाजता, दर सोमवार ते शुक्रवार एण्ड टीव्हीवर प्रसारित होणार आहेत. मालिकांचे सर्व भाग हिंदी झी5वरही उपलब्ध असतील.



## भारत फोर्ज आणि व्हीव्हीडीएन टेक्नॉलॉजीज यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षरी

पुणे (दैनिक संध्या) : एक अग्रगण्य उत्पादन आणि अभियांत्रिकी कंपनी भारत फोर्ज आणि उत्पादन अभियांत्रिकी आणि उत्पादन सेवा क्षेत्रातील जागतिक पुरवठादार कंपनी व्हीव्हीडीएन टेक्नॉलॉजीज यांनी प्रमुख तंत्रज्ञान-प्रणीत क्षेत्रांमध्ये धोरणात्मक सहयोगाचा मागोवा घेण्यासाठी आपल्या व्यापक समजुतीच्या आधारावर सामंजस्य करार (MoU) केला आहे. या सामंजस्य कराराअंतर्गत, दोन्ही पक्ष ऑटोमोटिव्ह, संरक्षण, एआय आणि डेटा सेंटर क्षेत्रांमधील अत्याधुनिक तंत्रज्ञानांमध्ये संयुक्तपणे संधींचा पाठपुरावा करण्याचा मानस बाळगतात. अभियांत्रिकी, उत्पादन आणि तंत्रज्ञान नाविन्यपूर्णता यातील त्यांच्या परस्परपूरक सामर्थ्यांचा उपयोग करून ऑटोमोटिव्ह, संरक्षण आणि एआय सर्व्हर प्लॅटफॉर्मसाठी अत्याधुनिक उत्पादने संयुक्तपणे विकसित करण्यासाठी आणि नाविन्यपूर्णतेला चालना देण्यासाठी ही धोरणात्मक भागीदारी स्थापन करण्यात आली आहे. जनरेटिव्ह इंटेलिजन्स, स्वायत्त प्रणाली आणि शाश्वत संगणनातील प्रगतीमुळे उद्योगांचे स्वरूप नवीन आकार घेत असताना वेगाने विकसित होणाऱ्या एआय जगाशी सुसंगत राहून हे सहकार्य दोन्ही कंपन्यांना जागतिक एआय परिसंस्थेमध्ये अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी आणि भविष्यकालीन उपाय सुविधांसाठी त्यांच्या परिवर्तनक्षम क्षमतेचा उपयोग करण्यास सक्षम बनवते. इलेक्ट्रॉनिक्स डिझाइन, सॉफ्टवेअर, सिस्टीम इंटिग्रेशन आणि उत्पादन क्षेत्रातील व्हीव्हीडीएनच्या सामर्थ्यांना प्रगत उत्पादन आणि अचूक अभियांत्रिकीतील भारत फोर्जच्या कौशल्याची जोड देऊन दोन्ही कंपन्या विकसित होत असलेल्या उद्योग आवश्यकतांशी आणि उभरत्या तंत्रज्ञानांशी सुसंगत अशा विस्तारक्षम व उच्च-प्रभावी उपायांच्या विकासाचा शोध घेण्याचे उद्दिष्ट ठेवत आहेत. भारत फोर्जचे उपाध्यक्ष आणि संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. अमित कल्याणी म्हणाले: "ही भागीदारी आम्हाला प्रगत तंत्रज्ञानांचा लाभ घेण्यास, नाविन्यपूर्णतेला चालना देण्यास आणि आमच्या ग्राहक व भागधारकांना पुरविल्या जाणाऱ्या उपायसुविधांच्या गुणवत्तेत वाढ करण्यास सक्षम करते. उत्कृष्टतेच्या आमच्या दृष्टिकोनाशी सुसंगत असलेल्या भागीदारांशी सहकार्य करून आम्ही ज्ञान देवाणघेवाण, कार्यक्षम कार्यपद्धती आणि दीर्घकालीन मूल्यनिर्मितीला प्रोत्साहन देणारी मजबूत परिसंस्था निर्माण करतो.

# पॅनासोनिक लाइफ सोल्यूशन्स इंडियाकडून रोमा अर्बन स्मार्ट स्विच लाँच

## तंत्रज्ञान व आकर्षकतेचे संयोजन असलेले आधुनिक स्मार्ट होम सोल्यूशन

नवी दिल्ली (दै. संध्या) :

पुणे, फेब्रुवारी 19, 2026 - पॅनासोनिक लाइफ सोल्यूशन्स इंडियाने आज रोमा अर्बन स्मार्ट टच सिरीजच्या लाँचची घोषणा केली. हे नेक्स्ट-जनरेशन स्मार्ट होम आयओटी सोल्यूशन भारतातील आधुनिक कुटुंबांसाठी अधिक सोयीसुविधा, सुरक्षितता आणि कार्यक्षम जीवनशैली देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. कनेक्टेड, डिझाइन-केंद्रित स्पेसेससाठी डिझाइन करण्यात आलेल्या नवीन स्विच श्रेणीमध्ये स्मार्ट होम कंट्रोलसह प्रीमियम आकर्षकता आहे.




आजच्या धावपळीच्या जीवनशैलीसाठी डिझाइन करण्यात आलेले रोमा अर्बन स्मार्ट टच स्विच वापरकर्त्यांना मोबाइल ॲप्लीकेशन, वॉईस कमांड्स आणि फेदर-टच फिजिकल स्विच या तीन इंटरफेसेसच्या माध्यमातून इलेक्ट्रिकल डिवाईसेसवर नियंत्रण ठेवण्यास सक्षम करते. हे हायब्रिड कंट्रोल मॉडेल स्मार्ट कार्यक्षमता देते, तसेच मॅन्युअल वापराला कायम ठेवते.

आयओटी स्विचेसची ही श्रेणी जीवनशैली उत्साहित करण्याची महत्त्वाकांक्षा असलेल्या आणि आधुनिक आकर्षकतेला महत्त्व देणाऱ्या गृहखरेदीदारांसाठी डिझाइन करण्यात आली आहे. ही श्रेणी तंत्रज्ञान-प्रेमी व्यावसायिक, प्रीमियम गृहमालक, आर्किटेक्ट्स आणि इंटीरिअर डिझाइनर्सच्या मागण्यांची देखील पूर्तता करते. लाइट्स, पंखे, एअर कंडिशनर्स व टेलिव्हिजन अशा विविध डिवाईसेससाठी वापरता येणारे हे स्विचेस् विनासायास स्मार्ट होम सेटअपची खात्री देतात.

या श्रेणीची खासियत म्हणजे स्विच सहजपणे बसवता येतो आणि याची रिट्रोफिट सुसंगतता होय. नवीन व जुन्या घरांसाठी अनुकूल असलेला हा स्विच घरामध्ये असलेल्या वायरिंग इन्फ्रास्ट्रक्चरसह काम करतो आणि अतिरिक्त वायरिंग किंवा स्वतंत्र गेटवे डिवाईसची गरज भासत नाही. यामुळे अपग्रेडमधील गुंतागुंती, खर्च व इन्स्टॉलेशन वेळ कमी होतो आणि स्मार्ट अपग्रेड्स अधिक सोपे व व्यावहारिक होते.

या सोल्यूशनचे कॉन्फिग्युरेशन युजर-अनुकूल आहे, ज्यामध्ये क्यूआर-आधारित ऑनबोर्डिंग आणि ॲपमध्ये सेटअप करण्यासंदर्भात मार्गदर्शन आहे. ही सिस्टम स्थिर कनेक्टीव्हीटीसाठी प्रमाणित 2.4 गिगाहर्ट्झ वाय-फाय नेटवर्क्सवर चालते. प्रीमियम ग्लास व मेटल फिनिशेसमध्ये उपलब्ध असलेली श्रेणी स्विचबोर्ड जागेचा सानुकूलपणे वापर करते, ज्यामुळे एकाच प्लेट आकारामध्ये जवळपास 50 टक्क्यांपर्यंत नियंत्रण मिळवणे शक्य होते.

कंपनीच्या स्मार्ट प्लॅटफॉर्मचे पाठबळ आणि मिरे ॲपद्वारे ऑपरेट होणाऱ्या या तंत्रज्ञानासह वापरकर्ते सानुकूल सीन्स व ऑटोमेशन प्रोफाइल्स तयार करू शकतात, ज्यामुळे एकाच कमांडसह एकाच वेळी विविध डिवाईसेस कार्यरत होऊ शकतात. बिल्ट-इन शेड्यूलिंग वैशिष्ट्ये देखील ऊर्जा अपव्यय कमी करण्यास मदत करतात, ज्यामुळे वीजेची बचत होते. या नवीन सोल्यूशनची खासियत म्हणजे सायबरसुरक्षितता व डेटा गोपनीयतेप्रती दृढ कटिबद्धता, जेथे या दोन्ही बाबींबाबत कोणतीही तडजोड करण्यात आलेली नाही. रोमा अर्बन स्मार्ट टच सिरीज क्लाऊड प्लॅटफॉर्मवर डिझाइन करण्यात आली आहे, जेथे पॅनासोनिक इंडियाकडे या प्लॅटफॉर्मचे मालकीहक्क आहेत, तसेच प्लॅटफॉर्मची देखभाल व व्यवस्थापन पॅनासोनिक इंडियाद्वारे केले जाते. डिवाईसेस व क्लाऊडमधील सर्व डेटाची देवाणघेवाण सुरक्षितपणे एनक्रिप्ट करण्यात आलेली आहे, ज्यामुळे अनधिकृत प्रवेश किंवा डेटा चोरीचा धोका कमी होतो.

या लाँचबाबत मत व्यक्त करत पॅनासोनिक लाइफ सोल्यूशन्स इंडियाच्या पॅनासोनिक इलेक्ट्रिक वर्क्सचे मॅनेजिंग डायरेक्टर योशियुकी काटो म्हणाले, आजचे ग्राहक तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत, वापरण्यास सोपे आणि व्हिज्युअली आकर्षक असलेल्या स्मार्ट सोल्यूशन्सचा शोध घेतात. रोमा अर्बन स्मार्ट स्विचमध्ये स्मार्ट होम कंट्रोल, आकर्षक डिझाइन आणि विद्यमान पायाभूत सुविधेमध्ये बदल न करता वैयक्तिकृत, कनक्टेड अनुभवांसह दैनंदिन राहणीमान अपग्रेड करण्यासाठी रेट्रोफिट सोसीयुविधा आहेत.



## जेजुरी गडावर समूह शिल्पा समोर पुष्पवृष्टी; मर्दानी खेळांची प्रत्याक्षिके

जेजुरी (दै. संध्या) :

अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत श्री खंडोबा गडावर छत्रपती शिवाजी महाराज व शहाजीराजे या पिता–पुत्रांच्या ऐतिहासिक भेटीचे समूहशिल्प तसेच मुख्य मंदिराच्या महाद्वाराजवळील ऐतिहासिक अडीच पायरी येथे विधिवत पूजन करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पवृष्टी करण्यात आली. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' व 'धर्मवीर संभाजी महाराज की जय' या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. देवस्थानच्या वतीने शिवजयंतीनिमित्त मुख्य गाभाऱ्यात, समूहशिल्प स्थळी तसेच मंदिर गडकोटामध्ये भव्य अश्वारूढ पुतळा ठेवून फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. जेजुरी गडावर ऐतिहासिक काळात छत्रपती शिवाजी महाराज आणि शहाजीराजे या पितापुत्रांची भेट झाली होती.या ऐतिहासिक भेटीचे जतन व्हावे यासाठी 2012 आली तत्कालीन विश्वस्त मंडळाने सुमारे दीड कोटी रुपये खर्च करून जेजुरी गडावर ब्राँझ धातू मध्ये छत्रपती शिवाजी महाराज,व शहाजीराजे यांच्या भेटीचे समूह शिल्प उभारले होते.2012 पासून दरवर्षी या समूह शिल्प ठिकाणी शिवजयंती उत्सव देवसंस्थान च्या वतीने साजरी केली जाते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या समोर अभिवादन केल्यानंतर शिवयोद्धा मर्दानी आखाडा, सांगवी (पुणे) यांच्या वतीने शिवकालीन मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके गडकोट परिसरात सादर करण्यात आली. या उत्सवा प्रसंगी श्री मार्तंड देवस्थानचे अध्यक्ष मंगेश घोणे, विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर, ॲड. विश्वास पानसे, अनिल सौंदडे, ॲड. पांडुरंग थोरवे, पोपट खोमणे, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, नगराध्यक्ष जयदीप बारभाई, उपनगराध्यक्ष गणेश निकुडे, नगरसेवक शिवाजी जगताप, अजिंक्य देशमुख, रोहित खोमणे, स्वप्निल हरपळे, गणेश डोंबे, परशुराम लाखे, नगरसेविका नीलम सातभाई, मोनिका घाडगे, भक्ती कोरफड, प्रज्ञा राऊत, मेघा उबाळे, स्नेहल भालेराव, स्वरूपा खोमणे, योगिता दोडके, मंदा बयास, माजी विश्वस्त संदीप जगताप, शिवसेना जेजुरी शहर प्रमुख विठ्ठल सोनवणे, सुरेश उबाळे,सिने अभिनेते श्रीश खेडेकर, वर्षा थोरवे, ग्रामस्थ-मानकरी, पुजारी वर्ग, भाविक भक्त तसेच देवस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## एलआयसी एमएफ टेक्नॉलॉजी फंड लाँच

पुणे (दै. संध्या) :

एलआयसी म्युच्युअल फंडाने एलआयसी एमएफ टेक्नॉलॉजी फंड प्रस्तुत करत असल्याची आज घोषणा केली. ही एक थीमॅटिक समभागसंलग्न (इक्विटी) योजना असून, तिची रचना ही पारंपारिक आयटी सेवांच्या पलीकडे विस्तारत असलेल्या भारताच्या तंत्रज्ञान क्षेत्राच्या विस्तृत प्रगतीपथात गुंतवणूकदारांना सहभागी करून घेण्यासाठी करण्यात आली आहे. योजनेचा प्रारंभिक प्रस्तुती कालावधी (एनएफओ) २० फेब्रुवारी २०२६ पासून खुला होईल आणि ६ मार्च २०२६ रोजी तो बंद होईल. ही योजना १९ मार्च २०२६ पासून निरंतर खरेदी आणि विक्रीसाठी पुन्हा खुली होईल. योजनेचे निधी व्यवस्थापन श्री. करण दोशी आणि श्री. जयप्रकाश तोष्णीवाल हे संयुक्तपणे करतील आणि बीएसई टेक टोटल रिटर्न इंडेक्स (टीआरआय) या मानदंड निर्देशांकावर तिची कामगिरी



बेतलेली असेल. पारंपारिक आयटी-केंद्रित फंड प्रस्तुतीच्या विपरीत, एलआयसी एमएफ टेक्नॉलॉजी फंडाचे उद्दिष्ट हे तंत्रज्ञान-चालित क्षेत्रांच्या विस्तृत श्रेणीमध्ये भांडवलाचे वाटप करणे आहे. ज्यामध्ये सेमीकंडक्टर उत्पादनाशी संलग्न कंपन्या, डेटा सेंटरचे चालक, डिजिटल कॉमर्स प्लॅटफॉर्म, इंटरनेट व्यवसाय आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान उपक्रमांचा समावेश आहे. एलआयसी म्युच्युअल फंडाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आर. के. झा या फंड प्रस्तुती संबंधाने म्हणाले; "सेमीकंडक्टर क्षेत्राचा विकास आणि डिजिटल पायाभूत सुविधांसाठी सरकारच्या दृढ वचनबद्धतेला २०२६-२७ केंद्रीय अर्थसंकल्पाने अधोरेखित केले आहे. भारताची तंत्रज्ञान परिसंस्था सेमीकंडक्टर फॅब्रिकेशनपासून ते कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या स्वीकारापर्यंत प्रगती करत असताना, आम्ही या क्षेत्रातील सूचीबद्ध समभागांमध्ये बहु-वर्षीय संरचनात्मक संधींना खुले करत आहोत." एलआयसी म्युच्युअल फंडाचे मुख्य गुंतवणूक अधिकारी (इक्विटी), श्री. योगेश पाटील म्हणाले; "आमचे गुंतवणूक धोरण हे तंत्रज्ञान मूल्य साखळीमध्ये शाश्वत वाढीचे चालक, निरोगी रोख प्रवाह आणि विस्तारसुलभ कार्यसंरचना असलेल्या व्यवसायांची ओळख पटवण्यावर लक्ष केंद्रित करणारे आहे.


## महाराष्ट्र शासन

**सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे- ४११००१**

**दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२२४८५ व २६१२२४१४ फॅक्स क्र.०२०/२६१२२४८५**

**Web- www.mahapwd.gov.in & e-mail- pune.ee@mahapwd.gov.in**

**ई-निविदा सूचना क्रमांक ७६ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे १ (दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२४८५/२६१२२४१४) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/ इमा-२, दिनांक २७/९/२०१८ व शासन सा. बां. विभाग मुंबई परिपत्रक क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २२/१०/२०१८ आणि शासन सा. बां. विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीएटी-२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २०/५/२०२१ आणि शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/इमा-२, दिनांक ३१/०८/२०२३ आणि शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/ प्र. क्र. १०४/इमा-२, दिनांक १४/२/२०२५ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गामध्ये नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदारांकडून **रू. ५०.०० लक्षपेक्षा जास्त व रू. १००.०० लक्ष पर्यंतच्या अंदाजपत्रकीय किंमतीचे** कामांसाठी **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे - १ यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा विक्री कालावधी तसेच सादर करावयाचा कालावधी | :- | दिनांक २५/०२/२०२६ सकाळी १०.०० वा.ते दिनांक ०४/०३/२०२६ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत. |
| ऑनलाईन ई निविदा उघडणेचा दिनांक व वेळ | :- | दिनांक ०६/०३/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. ऑनलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास) |

1. web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
2. http://mahatenders.gov.in

(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यांत येईल.)

सही/-
(प्रशांत शं. खैरमोडे)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पुणे ४११ ००१.

विमाका/पुणे/जाहि./३२४/२०२५-२६


# श्रीमद् विद्याधीश तीर्थ स्वामीजी यांची सनातन संस्थेच्या रामनाथी येथील आश्रमाला सदिच्छा भेट!

**घराघरात रामराज्य निर्माण केल्यास देशात रामराज्य येण्यास विलंब होणार नाही : श्रीमद् विद्याधीश तीर्थ स्वामीजी**

फोंडा (गोवा) (दै. संध्या) :



सनातन संस्था रामराज्य निर्माण करण्यासाठी कृतीशील आहे, ही अतिशय चांगली गोष्ट आहे. प्रत्येकाने स्वतःच्या घरात रामराज्य निर्माण केल्यास देशात रामराज्य निर्माण होण्यास विलंब होणार नाही, असे प्रतिपादन श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचे २४ वे पू. मठाधिपती श्रीमद् विद्याधीश तीर्थ स्वामीजी यांनी केले. पू. स्वामीजी यांनी सनातन संस्थेच्या रामनाथी, फोंडा, गोवा येथील मुख्य आश्रमाला सदिच्छा भेट दिली, या प्रसंगी स्वामीजींनी वरील गौरवोद्गार काढले. या मंगलप्रसंगी सनातनचे संत पू. पृथ्वीराज हजारे यांनी त्यांचे भावपूर्ण स्वागत केले. सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस आणि सनातनचे साधक श्री. निषाद देशमुख यांनी पू. स्वामीजींना आश्रमदर्शन करतांना सनातनच्या राष्ट्र आणि धर्म प्रसाराच्या कार्याविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी श्री रामनाथ देवस्थान समितीचे अध्यक्ष श्री. वल्लभ कुंकळ्ळीकर, समितीचे विधी सल्लागार अधिवक्ता राजेश तळावलीकर, समितीचे सदस्य श्री. संजीव बाले आणि श्री. रुद्र कापडी, तसेच श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचे गुरुजी श्री. संतोष आचार्य आणि श्री. वसंत आचार्य हेही उपस्थित होते. सनातन संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त श्री. वीरेंद्र मराठे यांनी स्वामीजींना आश्रमात येण्याविषयी श्री रामनाथ देवस्थान येथे जाऊन त्यांना प्रार्थना केली होती.

यावेळी पू. स्वामीजींचे गुरु श्रीमद् विद्याधिराज तीर्थ स्वामीजी यांच्या पादुकांचे पूजन सनातनचे साधक दांपत्य डॉ. पांडुरंग मराठे आणि सौ. मंगला मराठे यांनी केले. तसेच श्रीमद् विद्याधीश तीर्थ स्वामीजींची पंचारती केली. यानंतर सनातनचे संत पू. पृथ्वीराज हजारे यांनी स्वामीजींचा भावपूर्ण सन्मान केला.

साधकांना मार्गदर्शन करतांना श्रीमद् विद्याधीश तीर्थ स्वामीजी म्हणाले, "सनातन संस्था सनातन धर्माचे रक्षण करणे आणि सनातन धर्माचा प्रचार करण्यासाठी कटीबद्ध आहे, हे पाहून खूप आनंद होतो.

सनातन संस्था 'इतरांचे जीवन आनंदी करून त्यामधून स्वत: आनंद घेणे' या तत्त्वानुसार चालते. सनातन संस्था सर्वांना संघटित करून त्यांच्यामध्ये ईश्वर सेवेद्वारे धर्मजागृती करत आहेत. सनातनचे साधक प्रतिदिन देवाची उपासना करतात आणि सर्वांचे शुभ चिंततात. सत्संगाचे हे महत्त्व आहे.

सनातनच्या साधकांनी भगवान श्रीकृष्ण आणि श्रीराम यांची उपासना अशीच अधिक भक्तीने करत रहावी.

देवाशी आपण जोडलो गेल्याने देव आपल्या कार्यात येणाऱ्या अडचणी दूर करत असतो. देवाची उपासना करणाऱ्यांकडे दुसऱ्याचा पाहण्याचा दृष्टीकोनही सकारात्मक होत असतो. यामुळे ईश्वर भक्ती करणाऱ्यांना कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नसते. साधकांवर भगवंताचा कृपाशीर्वाद सतत राहो. त्यांचे कष्ट दूर होवो, अशी श्रीराम आणि श्री वीरविठ्ठल यांच्या चरणी प्रार्थना करतो."

श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाला नुकतीच ५५० वर्षे पूर्ण झाली, या निमित्ताने २८ नोव्हेंबर २०२५ या दिवशी पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते मठाच्या परिसरातील श्रीरामाच्या ७७ फूट उंच कांस्य धातूच्या भव्य मूर्तीचे अनावरण करण्यात आले होते.


## महाराष्ट्र शासन

**सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे- ४११ ००१**

**दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२२४८५ व २६१२२४१४ फॅक्स क्र.०२०/२६१२२४८५**

**Web- www.mahapwd.gov.in & e-mail- pune.ee@mahapwd.gov.in**

**ई-निविदा सूचना क्रमांक ७१ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे १ (दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२४८५/२६१२२४१४) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/इमा-२. दिनांक २७/९/२०१८ व शासन सा. बां. विभाग मुंबई परिपत्रक क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २२/१०/२०१८ आणि शासन सा. बां. विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीएटी-२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २०/५/२०२१ आणि शासन निर्णय क्र. सीएटी / २०१७/प्र. क्र. ०८/इमा-२, दिनांक ३१/०८/२०२३ आणि शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/ प्र. क्र. १०४/इमा-२, दिनांक १४/२/२०२५ अन्वये नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत आणि निविदेमधील दिलेल्या पात्रता पूर्ण करत असलेल्या कंत्राटदारांकडून रू. १००.०० लक्षपेक्षा जास्त किंमतीचे कामासाठी बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे - १ यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा उपलब्ध/ऑनलाईन विक्री कालावधी आणि निविदा सादर करावयाचा कालावधी | :- | दिनांक २०/०२/२०२६ सकाळी १०.०० वा.ते दिनांक २७/०२/२०२६ सांयकाळी १८.०० वाजेपर्यंत. |
| निविदा पुर्व चर्चा बैठक | :- | दि. २३/०२/२०२६ रोजी वेळ सकाळी १२.०० वाजता. मा. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, पुणे, नवीन मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे १ यांचे कार्यालयामध्ये. |
| ऑनलाईन ई निविदा उघडणेचा कालावधी | : | दिनांक ०२/०३/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. ऑनलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास) |

खालील संकेतस्थळावर ई-निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.

1. web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
2. https://mahatenders.gov.in
   (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास त्याबाबतची शुध्दीपत्रके वरील वेबसाईटवरती कळविण्यांत येईल.)
3. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे १ मध्यवर्ती इमारत आवार, पुणे या कार्यालयातील सुचना फलक.

सही/-
(प्रशांत शं. खैरमोडे)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पुणे ४११ ००१.

क्रमांक : आरओसी-2025-26/क्र-5/C6015

## थोडक्यात पण महत्वाचे...



### शर्मिला बाबर यांनी केली निगडी प्राधिकरण अग्निशमन केंद्राच्या कामाची पाहणी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून निगडी प्राधिकरण येथे नवीन अग्निशमन केंद्राच्या इमारतीच्या काम सुरू आहे. या इमारतीच्या कामाची महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर यांनी नुकतीच पाहणी केली. यावेळी संबधित अधिकाऱ्यांकडून कामाची माहिती घेत काम मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने अ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागाअंतर्गत निगडी प्राधिकरण येथील डॉ. हेडगेवार भवनाजवळ अत्याधुनिक अशा अग्निशमन क्रेंद्राचे काम सुरू आहे. या कामाच्या ठिकाणी महानगरपालिकेच्या उपमहापौर बाबर यांनी स्थापत्य विभागाच्या अ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यकारी अभियंता वैशाली ननावरे आणि संबधित अधिकारी यांच्यासह भेट दिली. अधिकाऱ्यांनी उपमहापौर शर्मिला बाबर यांना या कामाची माहिती दिली. दहा मजली इमारतीत तळमजल्यावर पार्किंग, अग्निशमन वाहन पार्कींग, स्टोअररुम, सुसज्ज कार्यालये, व्यायामशाळा, सदनिका इ. गोष्टींचा अंतर्भाव असणार आहे. अग्निशमन केंद्राच्या या इमारतीचे काम मुदतीत पूर्ण करावे. अग्निशमन विभागाला आवश्यक अशा सुविधा तेथे असतील, ही खबरदारी घ्यावी. कामाचा दर्जा राखावा, अशा सूचना यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.




### वायसीएम रुग्णालय वाऱ्यावर? सुरक्षेच्या 'गंभीर' त्रुटी; नेत्यांनी केली पाहणी

पिंपरी (दैनिक संध्या) : महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयाच्या सुरक्षेत गंभीर चुका आहेत. प्रवेशद्वाराजवळ कोणतीही सक्षम सुरक्षा यंत्रणा नाही. त्यामुळे समजाकंठकांकडून रुग्णालयामध्ये अनुचित प्रकार घडण्याची शक्यता असल्याची भीती महापालिकेचे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी व्यक्त केली आहे. भाऊसाहेब भोईर यांनी बुधवारी (दि. १८) वायसीएम रुग्णालयाची पाहणी केली. यावेळी त्यांना रुग्णालयाच्या प्रवेशाद्वाराजवळ सक्षम अशी कोणतीही सुरक्षा यंत्रणा दिसून आली नाही. यामुळे शहरातील काही समाजकंठकाच्या माध्यमातून रुग्णालयामध्ये हिंसकवृत्तीने अनुचित प्रकार होऊन सर्वसामान्य नागरिकांच्या जिवीताला धोका निर्माण होऊ शकतो अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे. रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराजवळ येणाऱ्या नागरिकांची मेटल डिटेक्टर मशिनद्वारे तसेच त्यांच्या बॅगांची तपासणी केली जात नाही असे पाहणीत निदर्शनास आले आहे. सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही सक्षम सुरक्षा यंत्रणा नसल्याने बॉम्ब अथवा घातक शस्त्र यांचा वापर करुन रुग्ण व डॉक्टर यांच्या जिवावर प्राणघातक हल्ला होऊन मोठी जिवीत हानी होऊ शकते. त्यामुळे वायसीएम येथील प्रवेशद्वारावर मेटल डिटेक्टर मशिन व बॅग चेकींग मशीन बसवावेत अशी मागणी भोईर यांनी केली आहे.

### भोसरीत मध्यरात्री पोलिसांची मोठी 'रेड'! 16 किलो गांजासह दोघांना रंगेहाथ पकडलं

पिंपरी (दैनिक संध्या) : मोठ्या प्रमाणात गांजाची साठवणूक करून तो विक्रीसाठी आणणाऱ्या दोघांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. ही कारवाई मंगळवारी (दि. १७ फेब्रुवारी) रात्री दीड वाजताच्या सुमारास गोविंद गार्डन जवळ, देवकर वस्ती, भोसरी येथे करण्यात आली. विशाल रावण मोहिते (वय २४, रा. यमाई नगर, साई पार्क, दिघी गाव) आणि गणेश बाबुराव थोरात (वय २४, रा. यमाई नगर, साई पार्क, दिघी गाव) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल अशोक आबासाहेब माने (वय २४) यांनी मंगळवारी (दि. १७) भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गोविंद गार्डन जवळ, देवकर वस्ती, येथे मोकळ्या जागेत मंगळवारी रात्री दीड वाजताच्या सुमारास आरोपींनी विक्रीसाठी १६ किलो १२० ग्रॅम वजनाचा गांजा बेकायदेशीरपणे जवळ बाळगला होता. पोलिसांनी धाड टाकून त्यांच्याकडून ८ लाख ८० हजार रुपये किमतीचा हा मुद्देमाल जप्त केला आहे. भोसरी पोलीस याबाबत अधिक तपास करत आहेत.

### महेंद्र थोरवेंचा मोठा शब्द! कर्जतच्या 'या' पुरातन मंदिरासाठी देणार 15 लाखांचा निधी

पिंपरी (दैनिक संध्या) : हिंदू परंपरेनुसार, 'सटवाई' ही नवजात बालकाचे भविष्य व नशीब लिहिणारी देवता मानली जाते. बाळ जन्मल्यानंतर साधारणपणे पाचव्या किंवा सहाव्या दिवशी तिचे पूजन केले जाते. कारण या दिवसापर्यंत बाळाचे नशीब कोरे असते व सटवाई येऊन त्याचे प्रारब्ध ठरवते अशी समजूत तथा आख्यायिका आहे. या देवीला अन्य नावानेही संबोधिले जाते. अशा या देवीचे मंदिर कर्जत नगरपरिषद येथील भिसेगाव येथे आहे. या पुरातन मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी सटूआई नगर मधील महिला ग्रामस्थांनी केली असून तशा आशयाचे निवेदन आमदार महेंद्र थोरवे यांना सादर केले आहे. सद्यस्थितीत भिसेगाव येथील हे सटवाई आईचे मंदिर छोटे खाणी उघड्यावर वसलेले आहे. साहजिकच त्यामुळे मूर्तीवर ऊन पावसाचा मारा होऊन तसेच धूळ उडून दूरवस्था होत आहे. सटवाईची जेव्हा यात्रा असते तेव्हा भाविक भक्त मोठ्या प्रमाणात येथे येत असतात. उत्सव साजरा केला जातो. त्यामुळे हे मंदिर नव्याने बांधणे तथा त्याचा जीर्णोद्धार करणे गरजेचे असल्याचे मत येथील सटूआई नगर मधील महिलांची मागणी आहे. मंदिर उभारणे गरजेचे आहे. यासाठी भिसेगावातील सटू आई विभागातील महिलांनी ज्योती कुळकर्णी यांच्या माध्यमातून आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेऊन मंदिर बांधण्यासाठी निधी देण्यात यावा अशी मागणी केली आहे. आणि यासाठी 15 लाखाचा निधी देण्यात येईल असे आश्वासन आमदार थोरवे यांनी या गावातील महिलांना दिले आहे. निवेदन देताना ज्योती कुळकर्णी, रेणुका जाधव, अस्मिता घोडविंदे नंदा देशमुख , तारा दिसले, अशा घुटे, संगीता अन्सारी आदी महिला उपस्थित होत्या.

# जल संवर्धनाच्या दिशेने संत निरंकारी मिशनचा सशक्त उपक्रम

**'प्रोजेक्ट अमृत'चा चौथा टप्पा : इंद्रायणी नदी संवर्धनासाठी देहू-आळंदी-चऱ्होली येथे भव्य स्वच्छता अभियान**




**आळंदी (दै. संध्या) :**

जेव्हा सेवा हीच साधना ठरते आणि निसर्गाविषयी संवेदनशीलता जीवनाचा मूलमंत्र बनते, तेव्हा समाजाला नवी दिशा देणारे पवित्र संकल्प जन्माला येतात. मानवसेवा व लोककल्याणाच्या या दिव्य भावनेला साकार रूप देत संत निरंकारी मिशनच्या वतीने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचा भव्य शुभारंभ रविवार, २२ फेब्रुवारी २०२६, सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत, परम श्रद्धेय निरंकारी सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या पावन मार्गदर्शनाखाली संपूर्ण भारतभर एकाच वेळी करण्यात येणार आहे.

या अभियाना अंतर्गत पुणे जिल्ह्यातील इंद्रायणी, मुळा, मुठा, भीमा, भामा, घोडनदी, पवना, वेळू, कुकरी, मिना, कऱ्हा, मांडवी, आनंदी या नद्यांसह शहरातील विविध तलाव अशा ४२ ठिकाणी ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

संत निरंकारी मंडळाचे सचिव आदरणीय जोगिंदर सुखीजा यांनी माहिती देताना सांगितले की, हा विशाल उपक्रम देशभरातील १५०० हून अधिक ठिकाणी एकाच वेळी आयोजित केला जाईल. या महामोहिमेचे हे अभूतपूर्व प्रमाण या मोहिमेला ऐतिहासिक स्वरूप देईल, ज्यामुळे जलसंधारण आणि स्वच्छतेचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचेल.

पाणी हे केवळ एक साधन नसून जीवनाचा आधार आणि ईश्वराची अमूल्य देणगी आहे त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे हि जागृती समाजामध्ये निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. संत निरंकारी मिशनने सदगुरु बाबा हरदेव सिंह जी यांच्या प्रेरणादायी शिकवणी आत्मसात करून सन २०२३ मध्ये संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने 'प्रोजेक्ट अमृत'ची सुरुवात केली होती. जलसंवर्धन हा उपक्रम केवळ एखाद्या दिवसापुरता किंवा मर्यादित मोहिमेपुरता न ठेवता तो एक जीवनशैली, संस्कार आणि सेवाभाव म्हणून स्वीकारण्याची प्रेरणा बनेल.

जिथे स्वच्छ जलातून स्वच्छ मन आणि स्वच्छ समाज घडू शकेल. नद्या, तलाव, सरोवरे, विहिरी व झरे अशा नैसर्गिक जलस्रोतांच्या संरक्षणासाठी समर्पित या जनआंदोलनाने आपल्या पहिल्या तीन टप्प्यांत सेवा, समर्पण व सहभागाचे उत्कृष्ट उदाहरण निर्माण केले आहे. याच यशामुळे प्रेरित होऊन हा चौथा टप्पा अधिक व्यापक, संघटित व दूरदृष्टीपूर्ण स्वरूपात राबविला जात आहे, ज्यामुळे समाजातील प्रत्येक घटकात निसर्गाबद्दल जागरूकता व सहभागाची सशक्त भावना निर्माण होईल.

> मधुर समूह गायन, जनजागृती चर्चासत्रे आणि सोशल मीडिया मोहिमेद्वारे जलजन्य आजार आणि स्वच्छतेचे महत्व अधोरेखित केले जाणार आहे.जेव्हा मन निर्मळ असते तेव्हाच निसर्ग स्वच्छ राहतो, आणि जेव्हा सेवेत समर्पण असते तेव्हा समाजाचे नवनिर्माण होते हे अभियान त्याच संकल्पनेला बळ देणारे आहे. सतगुरु माताजींचा संदेश सदैव हाच राहिला आहे की, आपण ही पृथ्वी पुढील पिढ्यांसाठी अधिक सुंदर, स्वच्छ आणि संतुलित स्वरूपात जपून ठेवली पाहिजे. 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' हे अभियान त्या पवित्र संकल्पाचे मूर्त स्वरूप आहे, जे समाजाला निसर्ग, समाज व आत्म्याशी जोडून करुणा, समतोल आणि सौहार्दपूर्ण भविष्याच्या दिशेने पुढे नेण्याचे काम करेल.

## पिंपरी-चिंचवड पालिकेच्या 'त्या' पुरस्कारावर प्रश्नचिन्ह

**पिंपरी (दै. संध्या) :**

शहरातील पवना नदी सध्या प्रचंड प्रदूषणाच्या विळख्यात सापडल्या असताना पिंपरी-चिंचवड महापालिकेला यंदाचा 'माझी वसुंधरा'अभियानातील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. नद्यांची प्रत्यक्ष स्थिती आणि पुरस्कारातील गौरव यामधील तफावत पाहता नागरिकांमधून आश्चर्य आणि संताप व्यक्त होत आहे. "पवना नदी वाचली नाही, तर पुरस्काराचा अर्थ काय?" असा सवाल पर्यावरणप्रेमींनी उपस्थित केला आहे. पवना नदीच्या पात्रात गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर माती, दगड आणि बांधकामाचा राडारोडा टाकला जात आहे. काळेवाडी, चिंचवडगाव परिसरात नदीपात्र अरुंद होत चालले आहे. महापालिकेला माहिती असूनही काही ठिकाणी वर्षानुवर्षे टाकलेला भराव अद्याप हटविण्यात आलेला नाही. पावसाळ्यात नदीची वहनक्षमता कमी होऊन पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका वाढत असल्याची भीती स्थानिक व्यक्त करतात. नदीत मिसळणाऱ्या औद्योगिक आणि रासायनिक सांडपाण्यामुळे जलजीवांवर विपरीत परिणाम होत आहे. अलीकडील काळात काही ठिकाणी मृत अवस्थेत मासे आढळल्याच्या घटना घडल्या आहेत. पाण्याचा रंग बदलणे, फेस साचणे आणि दुर्गंधी वाढणे यामुळे नदीकाठच्या वस्त्यांतील नागरिक त्रस्त आहेत.

## एस. एन. बी. पी. महाविद्यालयात अभिरूप न्यायालय संपन्न

**पिंपरी (दै. संध्या) :**




एस. एन.बी.पी. विधी महाविद्यालय, मोरवाडी, पिंपरी, पुणे येथे "श्रीमती सुभद्रा भोसले ५वी राष्ट्रीय पातळीवरील ऑनलाइन अभिरूप न्यायालय (मुट कोर्ट ) स्पर्धेचे दोन दिवसीय आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये ३२ महाविद्यालये सहभागी झाली होती. विधी शाखेतील विद्यार्थ्यांना वकिली कोशल्ये, लीगल रिसर्च व वादविवाद संबधी प्रोत्साहन देणे हा या स्पर्ध्येचा उद्देश आहे. या स्पर्ध्येचे उद्‌घाटन मा.प्राचार्या डॉ. रोहीणी जगताप यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेमध्ये डॉ. अरुणा फारसवाणी (माजी मुख्य न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, ठाणे)प्रमुख पाहुणे होते. प्रोफेसर डॉ.एम. एच. हिराणी (माजी विधी विभाग प्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ , पुणे), ॲडव्होकेट वैभव कुलकर्णी (अधिवक्ता, सर्वोच्च न्यायालय), डॉ. प्रियांका अग्रहारी (प्रिन्सीपल, एस. एन.बी. पी. इंटरनेशनल स्कूल, मोरवाडी) हे पारितोषिक वितरण कार्यक्रमास उपस्थित होते. या स्पर्ध्येत आए. एल. एस. विधी महाविद्यालयाने विजेतेपद पटकाविले, तर हेद्राबाद तेलंगना च्या एस. व्ही. के. एम. एन. एम. आए. एम. एस. स्कूल ऑफ लॉने उपविजेतेपद मिळवले. बेस्ट मेमोरियल मुंबईच्या किशनचंद चेलाराम लॉ कॉलेज तर बेस्ट ॲडव्होकेटचा मान गुरु गोविंद सिंग इंद्रप्रस्थ विद्यापीठ , न्यू दिल्ली च्या विधी विभागातील आद्या कुमार याला मिळाला. विजेत्या संघास ट्रॉफी व रोख रक्कम बक्षिस म्हनून दिले. ॲडव्होकेट अर्पिता गोस्वामी या कार्यक्रमाच्या समन्वयक होत्या तर मा.प्राचार्या डॉ. रोहीणी जगताप यांनी आभार मानले. एस. एन.बी.पी. विधी महाविद्यालयाच्या मुट कोर्ट सोसायटीने या स्पर्धेचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास महाविद्यालयाचा शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी, माजी विद्यार्थी मोठया संख्याने उपस्थित होते.

## पिंपरी-चिंचवडमध्ये शिष्यवृत्ती परीक्षेसाठी १५,५०७ विद्यार्थी सज्ज

### इयत्ता पाचवीसाठी ४४ तर आठवीसाठी ३० केंद्रे; २२ फेब्रुवारी रोजी दोन सत्रांत परीक्षा



**परीक्षार्थींसाठी महत्त्वाचे**

- परीक्षेची वेळ : पहिला पेपर - सकाळी 11 ते 12. 30; दुसरा पेपर - दुपारी 2 ते 3.30
- परीक्षार्थीला दोन्ही पेपर देणे अनिवार्य
- प्रत्येक पेपरमध्ये बहुपर्यायी 75 प्रश्न
- योग्य पर्यायाचे वर्तुळ रंगविण्यासाठी निळ्या अथवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा

**पिंपरी (दै. संध्या) :**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणारी शिष्यवृत्ती परीक्षा रविवार (दि. 22) होत आहे. यामध्ये पिंपरी-चिंचवड शहरात 44 केंद्रांवर इयत्ता पाचवीचे 9542 विद्यार्थी तर 30 केंद्रांवर इयत्ता आठवीचे 5965 विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. परीक्षेसाठी 74 केंद्र संचालक, 12 सह केंद्रसंचालक, 765 पर्यवेक्षक व 199 शिपाई यांची नेमणूक करण्यात आली आहे. या परीक्षेला महापालिका, खासगी, अनुदानित, विनाअनुदानित, स्वयं अर्थसहायीत शाळांतील विद्यार्थी परीक्षा देतात. मराठी, इंग्लिश, हिंदी व उर्दू या चार माध्यमातून परीक्षा देता येते.

परीक्षेसाठी दोन पेपर असून विद्यार्थ्यांनी सकाळी दहा वाजता संबंधित परीक्षा केंद्रावर हजर रहावे. पहिला पेपर प्रथम भाषा व गणित असून सकाळी 11:00 ते 12:30 या वेळेत होणार आहे. दुसरा पेपर तृतीय भाषा व बुद्धिमत्ता चाचणी दुपारी 2:00 ते 3:30 या वेळात होणार आहे. परीक्षार्थ्याला दोन्ही पेपर देणे अनिवार्य आहे.

प्रत्येक पेपरमध्ये 75 प्रश्न असून बहुपर्यायी उत्तरामधून योग्य पर्यायाचे वर्तुळ रंगवायचे आहे. वर्तुळ रंगविण्यासाठी काळ्या किंवा निळ्या बॉल पेनचाच वापर करावयाचा आहे. जेल पेन, शाई पेन, पेन्सिलचा वापर वर्तुळ रंगविण्यासाठी करू नये. प्रत्येक प्रश्नच्या योग्य उत्तराला 2 गुण दिले जाणार आहेत.

परीक्षेस पात्र होण्यासाठी किमान 40 टक्के गुण मिळविणे आवश्यक आहे.

उत्तरपत्रिकांची तपासणी संगणकावर होणार असल्याने विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळाव्यात आदी सूचना विद्यार्थ्यांना देण्यात आल्या आहेत.

## नवी मुंबईच्या निर्णयानंतर पिंपरी-चिंचवडमध्ये स्वीकृत नगरसेवक नियम बदलणार?

**पिंपरी (दै. संध्या) :**

नवी मुंबई महापालिकेत स्वीकृत नगरसेवक पदासाठी गटनेत्यांच्या स्वाक्षरीची सक्ती रद्द केली आहे. त्याचे पडसाद पिंपरी-चिंचवड महापालिकेतही उमटू लागले आहेत. नवी मुंबईच्या धर्तीवर येथेही नियमांमध्ये बदल होणार का, तसेच प्रशासन नियमांवर ठाम राहणार की, राजकीय दबावापुढे झुकणार, याबाबत महापालिका वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे. नवी मुंबई महापालिकेत स्वीकृत सदस्यपदाच्या अर्जावर गटनेत्यांची स्वाक्षरीची सक्ती तांत्रिकदृष्ट्या चुकीची असल्याचे सांगत ती मागे घेण्यात आली. या निर्णयामुळे विविध क्षेत्रांतील जाणकारांना संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे सांगितले जात आहे. पारदर्शकता व व्यापक सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. मात्र, अशा बदलांमुळे स्वीकृत सदस्यपदाचा वापर केवळ राजकीय समतोल साधण्यासाठी होणार का, असा सवालही उपस्थित होत आहे. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना संधी देण्यासाठी अटी शिथिल करणे आवश्यक असल्याचे काही जणांचे म्हणणे आहे. प्रशासनातील सूत्रांच्या मते, नियमांमध्ये मनमानी बदल केल्यास प्रक्रिया पूर्णपणे राजकीय होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. नवी मुंबई महापालिकेच्या निर्णयानंतर आता पिंपरी-चिंचवडमध्येही तशीच पावले उचलली जाणार का, अधिकाऱ्या नियमांवर बोट राहणार की, राजकीय पक्षांच्या तालावर निर्णय होणार, याबाबत शहरात उत्सुकता निर्माण झाली आहे. महापालिकेत सर्वच नगरसेवक थेट निवडणुकीतून जनतेकडून निवडून येत नाहीत. काही सदस्यांना त्यांच्या विशिष्ट क्षेत्रातील कामगिरी, अनुभव आणि तज्ज्ञतेच्या आधारे सभागृहात नामनिर्देशित केले जाते.

## छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्वात 'शिवगर्जना' ठरतेय मुख्य आकर्षण

**पहिल्या प्रयोगाला शिवप्रेमींची भरभरून दाद**

**पिंपरी (दै. संध्या) :**

'जय भवानी, जय शिवाजी', 'हर हर महादेव' च्या जयघोषात आणि स्वराज्याच्या इतिहासाची साक्ष देणाऱ्या नेत्रदीपक दृश्यांनी निगडी येथील नियोजित महापौर निवास परिसर अक्षरशः दुमदुमून गेला. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'विचार प्रबोधन पर्वा'अंतर्गत सादर करण्यात आलेल्या 'शिवगर्जना' या भव्य महानाट्याच्या पहिल्या प्रयोगाला शिवप्रेमींनी प्रचंड प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते या महानाट्याचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, नगरसदस्य अमित गावडे, राजू मिसाळ, अभिषेक बारणे, चेतन भुजबळ, नगरसदस्या शैलजा मोरे, अर्चना कारंडे,माजी नगरसदस्य मारुती भापकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते जीवन बोराडे, सागर तापकीर, निलेश शिंदे, प्रकाश जाधव, संतोष सातपुते, आबासाहेब ढवळे, सतीश काळे, संतोष कवडे,श्रीमंत जगताप,नागनाथ म्हस्के, ज्ञानेश्वर लोभे, सचिन आल्हाट, संदीप निकम, कुणाल कांबळे, सचिन बोऱ्हाडे, संदीप बोराडे, सागर लश्करे, स्वप्निल शिंदे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मा. राष्ट्रपती महोदयांसमोर सादर झालेल्या या भव्य महानाट्यप्रयोगात सुमारे २५० हून अधिक कलाकारांनी सहभाग नोंदवत शिवचरित्रातील महत्त्वपूर्ण ऐतिहासिक प्रसंग जिवंत केले. घोडे, उंट, भव्य नेपथ्य, पारंपरिक वेशभूषा, अत्याधुनिक प्रकाशयोजना, प्रभावी ध्वनीसंयोजन आणि नेत्रदीपक आतषबाजीच्या सहाय्याने उभारण्यात आलेल्या प्रत्येक दृश्याला उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महानाट्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्माआधीचा सामाजिक व राजकीय कालखंड, बालपण, संत तुकाराम महाराज आणि शिवाजी महाराज यांची ऐतिहासिक भक्ती-शक्ती भेट, तोरणा विजय, स्वराज्य स्थापनेचा संघर्ष, शेतकऱ्यांसाठीचे आज्ञापत्र, प्रतापगड मोहीम, पन्हाळगड वेढा व सुटका, स्वराज्याच्या आरमाराची उभारणी, पुरंदरचा तह, आग्रा भेट, नरवीर तानाजी मालुसरे यांचा कोंढाणा विजय आणि भव्य शिवराज्याभिषेक सोहळा यांसारखे प्रसंग प्रभावीपणे सादर करण्यात आले. या सजीव सादरीकरणामुळे उपस्थितांमध्ये राष्ट्राभिमानाची भावना जागृत होत अनेकांनी उभे राहून या प्रसंगांना दाद दिली.

कार्यक्रमस्थळी नागरिकांसाठी सुयोग्य बैठक व्यवस्था, वाहतूक नियोजन, सुरक्षा व्यवस्था तसेच आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे तसेच सहाय्यक सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम यांच्या अधिपत्याखाली कायदा सुव्यवस्थेसाठी परिसरात २० सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आली होती.

दरम्यान, 'शिवगर्जना' या महानाट्याचे आणखी दोन प्रयोग १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी याच ठिकाणी सायंकाळी ६.३० वाजता सादर करण्यात येणार असून नागरिकांनी या भव्य महानाट्यप्रयोगाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

> 'शिवगर्जना' या महानाट्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची, दूरदृष्टीची आणि सुशासनाच्या तत्त्वांची प्रभावी मांडणी नव्या पिढीसमोर होत आहे. इतिहास केवळ वाचण्याचा विषय नसून तो अनुभवण्याचा आहे, आणि अशा भव्य सादरीकरणातून युवकांना स्वराज्याच्या मूल्यांची प्रेरणा मिळणे ही काळाची गरज आहे. या महानाट्यामुळे नागरिकांमध्ये राष्ट्राभिमानाची भावना अधिक दृढ होईल, असा विश्वास आहे.
> **– रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**



## माहूर विद्यालयाच्या जडण-घडणीत स्व. काकांचे योगदान मोलाचे

**बबुसाहेब माहूरकर**

जेजुरी (दै. संध्या) :

श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ ,सासवड संचलित माहूर माध्यमिक विद्यालय, माहूर (ता. पुरंदर) येथे इयत्ता दहावी बोर्ड परीक्षार्थी विद्यार्थ्यांचा शुभचिंतन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बबुसाहेब माहूरकर (मा. जि. प. सदस्य, पुणे) होते. प्रमुख पाहुणे म्हणून मोहनरावजी साळवी (सेवानिवृत्त सेल्स टॅक्स असिस्टंट, पुणे), ज्ञानेश्वर जगताप (तंटामुक्ती अध्यक्ष), सत्यवानजी गोळे, अमोल गोळे व गजाभाऊ जगताप उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन, शिवप्रतिमा पूजन तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष चंदुकाका जगताप यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पवार यांनी आपल्या भाषणात विद्यालयाचा गुणवत्तापूर्ण शैक्षणिक आलेख मांडला. त्यानंतर मान्यवरांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सर्व गुरुजनांचा गौरव करण्यात आला.

या प्रसंगी दहावीच्या विद्यार्थ्यांनी विद्यालयासाठी तीन सीसीटीव्ही कॅमेरे व डीव्हीआर असे एकूण सुमारे सात हजार दोनशे रुपयांचे साहित्य भेट स्वरूपात देऊन कृतज्ञता व्यक्त केली. पाचवी ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत परीक्षार्थींना शुभेच्छा दिल्या.

प्रमुख पाहुणे मोहनराव साळवी यांनी आपल्या मनोगतात बालपणीच्या कष्टमय व आनंदी शालेय जीवनाच्या आठवणी सांगितल्या. त्यांनी अग्निपंख या पुस्तकातील प्रेरणादायी प्रसंग सांगत विद्यार्थ्यांना स्वप्ने पाहण्याची व ती पूर्ण करण्याची प्रेरणा दिली. तसेच परदेशातही मराठी भाषेचा अभिमानाने वापर कसा करता येतो, याची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण केला.

अध्यक्षीय भाषणात बबुसाहेब माहूरकर यांनी विद्यालयाच्या स्थापनेत ग्रामस्थ व संस्थेचे मोलाचे योगदान असल्याचे नमूद केले. "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, हे आम्हाला स्व. काकांच्या कृतीतून शिकायला मिळाले," असे सांगत त्यांनी संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली व विद्यार्थ्यांना उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

आभार इंद्रभान पठारे tar सूत्रसंचालन श्रीमती स्नेहलता बोरावके व श्री महेंद्र भोसले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रामचंद्र जगताप, विकास राऊत, लता गायकवाड, रामप्रभू पेटकर, मंगल जगताप, श्रीकांत गव्हाणे, रामचंद्र कुंभार, श्रीकांत खोमणे तसेच जीवन कड यांनी परिश्रम घेतले.

# शिवजयंतीनिमित्त भव्य मिरवणुक

**अभिवादन कार्यक्रम आणि आरोग्य जाणीव जागृती रॅलीचे आयोजन**



पुणे (दै. संध्या)

गुरुवार दिनांक 19/02/2026 रोजी शिवजयंती कार्यक्रम श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणे 2,शुक्रवार पेठ येथे संपन्न झाला. अभिवादन कार्यक्रम आणि भव्य मिरवणूक असे 'युगपुरुष छत्रपती श्री शिवाजी महाराज 'यांच्या जयंती कार्यक्रमाचे शिवजयंती स्वरूप होते.संस्थेचे ऑनररी सेक्रेटरी व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री जनार्दन ग.थोरात, प्रमुख पाहुणे म्हणून इतिहास संशोधक व इतर पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. सकाळी ठीक 8.00 वाजता श्री शिवाजी मराठा हायस्कूल मधून शिवाजी मराठा सोसायटीच्या इतर शाखांसोबत अध्यापक महाविद्यालय अरण्येश्वर, पुणे - 9 चे प्राचार्य डॉ चौगुले सर,प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व प्रथम व द्वितीय वर्ष बी एड विद्यार्थी यासह सहभागी झाले. प्रथम शिवजयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सर्वांच्या उपस्थितीत राज्यगीत झाले. पाहुण्यांचा सत्कार व मान्यवरांचा सत्कार पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर प्रमुख पाहुणे -शिव व्याख्याते मा. डॉ. प्रमोद बोराडे सरांनी आपल्या मनोगतात शिवरायांच्या थोर कार्याचे वर्णन -शिव चरित्रतील अनेक प्रसंगातून केले. शिवरायांचे हिंदवी स्वराज्यातील योगदान स्पष्ट केले.त्यानंतर शिवरायांची रथयात्रा करून भव्य मिरवणूक यावेळी काढण्यात आली. भव्य मिरवणुकीत संस्थेचे ऑनररी सेक्रेटरी व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री जनार्दन ग.थोरात, प्रमुख पाहुणे म्हणून इतिहास संशोधक व इतर पदाधिकारी व मान्यवर विद्यार्थांसह उपस्थित होते.पारंपारिक वेशभूषेत विद्यार्थी सहभागी झाले. 'जय भवानी,जय शिवाजी', 'हर हर महादेव' चा जयघोष भगवे झेंडे फडकून होत होता.

अध्यापक महाविद्यालय अरण्येश्वर, पुणे - 9 महाविद्यालयाने शिवजयंती कार्यक्रमानिमित्त आरोग्य जाणीव जागृती रॅली आयोजित केली.

स्वच्छता,आरोग्य रक्षा आणि बालकांसाठी पोषक आहार या विषयावर विद्यार्थ्यांनी घोषवाक्य तयार केली. विविध घोषणा दिल्या. आरोग्य विषयक जाणीव जागृती समाजामध्ये करण्याचा प्रयत्न केला. श्री शिवाजी मराठा सोसायटी मैदान - बाजीराव रस्ता - महात्मा फुले मंडई - छत्रपती शिवाजी रस्ता - मामलेदार कचेरी ते शिवाजी मराठा सोसायटी हा मार्ग रॅली साठी होता. मंडई परिसरात जनजागृती करण्यात आली.शालेय विद्यार्थ्यांनी लेझीम, ढोल ताशा, लाठी काठी, इत्यादी पारंपारिक खेळ सादर केले. अशाप्रकारे शिवजयंती कार्यकामामधून शिवरायांना अभिवादन, शिव कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. तसेच आरोग्य विषयक रॅली द्वारे आरोग्य विषयक सामाजिक व वैयक्तिक भानही जपले गेले.

## वृंदावन कॉलनीतील चिमुकल्यांची नगराध्यक्षांना भावनिक साद

आळंदी (दै. संध्या)

मोबाईलच्या पडद्याऐवजी मोकळ्या मैदानावर धावण्याची आस लागलेल्या वृंदावन कॉलनीतील बाळगोपाळांनी थेट नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांना निवेदन देत खेळाच्या मैदानाची मागणी केली आहे. "आम्हाला खेळायला जागा द्या" असा भावनिक सूर त्यांच्या अर्जातून उमटला आहे.

वृंदावन कॉलनीमध्ये लहान मुलांसाठी स्वतंत्र मैदान नसल्याने त्यांना रस्त्यावर खेळावे लागते. मात्र वाहनांची ये-जा आणि परिसरातील नागरिकांची मनाई यामुळे खेळाचा आनंद हिरावला जात असल्याची खंत मुलांनी व्यक्त केली आहे. कॉलनीतील मोकळी जागा सध्या चारचाकी वाहनांच्या पार्किंगसाठी वापरली जात



असल्याने मुलांना खेळण्यासाठी जागाच उरत नसल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे. "आम्हालाही धावायचंय, खेळायचंय, मित्रांसोबत आनंदाने वेळ घालवायचाय," असा साधा पण मनाला भिडणारा संदेश या अर्जातून देण्यात आला आहे. रस्त्यावर खेळताना होणारा त्रास आणि मोकळ्या जागेवर वाहनांचे पार्किंग यामुळे बालपणच कोमेजत असल्याची वेदना त्यांनी मांडली होती.

## बनावट वेबसाईटस्, ॲप आणि खोट्या ई-चलन लिंकपासून सावध राहा

**परिवहन विभागाचे नागरिकांना आवाहन**


बारामती (दै. संध्या)

वाहनधारक आणि चालकांची आर्थिक फसवणूकीचे प्रकार वाढल्याच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाने बनावट वेबसाईटस्, संशयास्पद मोबाईल ॲप्स (एपीके) आणि खोट्या ई-चलन लिंकपासून सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी, ई-चलन यांसारख्या सेवांच्या नावाखाली अनेक नागरिकांची वैयक्तिक माहिती व आर्थिक व्यवहारांची फसवणूक होत असल्याचे परिवहन विभागाच्या निदर्शनास आले आहे.

फसवणूक करणारे मोबाईल एसएमएस किंवा व्हॉट्सॲप संदेशांद्वारे 'आपल्या वाहनाचे चलन बाकी असून त्वरित दंड भरा' तसेच 'वाहन चालविण्याचा परवाना सस्पेंड होणार असून त्वरित तपासणी करा' अशा संदेशांसह अनधिकृत पेमेंट लिंक पाठवून पैसे उकळण्याचा प्रयत्न करत आहेत. परिवहन विभागाने याबाबत सांगितले की, विभागीय परिवहन कार्यालय किंवा परिवहन विभाग नागरिकांना कधीही व्हॉट्सॲप वरून पेमेंट लिंक पाठवत नाही. तसेच 'RTO Services.apk', 'mParivahan_Update.apk', 'eChallan Pay.apk' अशी अज्ञात एपीके फाईल्स डाउनलोड केल्यास मोबाईलमधील ओटीपी, बँकिंग माहिती आणि इतर संवेदनशील माहिती चोरी होण्याचा धोका आहे.

नागरिकांनी वाहन नोंदणी सेवा (VAHAN) – https://vahan.parivahan.gov.in ड्रायव्हिंग लायसन्स सेवा (SARATHI) – https://sarathi.parivahan.gov.in परिवहन सेवा https://www.parivahan.gov.in तसेच ई-चलन पोर्टल https://echallan.parivahan.gov.in या gov.in डोमेनच्या अधिकृत सरकारी संकेतस्थळांचाच वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे .com, .online, .site, .in किंवा इतर कोणत्याही डोमेनवरील वेबसाइटवर वाहनधारकांनी माहिती नोंदवू नये. कोणताही संशयास्पद संदेश किंवा लिंक प्राप्त झाल्यानंतर तात्काळ नॅशनल सायबर क्राईम पोर्टलचे https://www.cybercrime.gov.in सायबर फसवणूक हेल्पलाइन क्रमांक १९३० किंवा जवळचे जिल्हा सायबर पोलीस स्टेशन या ठिकाणी तक्रार नोंदवावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यांनी केले आहे.




## वाढदिवसानिमित्त वृक्षभेट कार्यक्रम



सासवड (दै. संध्या)

सासवड नगरपालिकेच्या विद्यमान नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त संत नामदेव विद्यालय, सोपान नगर सासवड येथे श्री.कानिफनाथ विद्यालय, भिवरी या प्रशालेचे माजी मुख्याध्यापक मनोहर कामठे यांच्या हस्ते विविध प्रजातीचे वृक्ष भेट म्हणून देण्यात आले,सदर कार्यक्रमास सासवड नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष अजित काळुराम जगताप,माजी नगरसेवक योगेश गिरमे,जयंत पाणबुडे, डॉ. नंदकुमार निगडे,संत नामदेव विद्यालयातील आनंदराव कदम,उज्वला कुंजीर,स्मिता जगदाळे हे शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. मनोहर कामठे हे निसर्ग व पर्यावरण प्रेमी असल्याने आपल्या घराभोवती विविध वृक्ष वेलींची लागवड व जोपासना करत असतात त्यातूनच इतरांना झाडे लावण्यास प्रवृत्त करतात.त्यातूनच आनंदी काकी जगताप यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आपण शाळेला वृक्ष भेट दिल्याचे त्यांनी मनोगतात सांगितले.

## विद्यार्थ्याला पोलिस ठाण्यात डांबून मारहाण केल्याचा आरोप

**एपीआय अमित शेटे यांच्या निलंबनासाठी जनआक्रोश आंदोलनाचा इशारा**

पुणे (दै. संध्या)

काळेपडळ पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमित शेटे यांनी परीक्षेच्या दिवशी एका विद्यार्थ्याला पोलिस ठाण्यात डांबून ठेवून मारहाण केल्याचा आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) पुणे शहर युवक कार्याध्यक्ष संजय पट्टणपल्लु यांनी केला आहे. या प्रकरणी शेटे यांच्या निलंबनासाठी लवकरच जनआक्रोश आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

मिळालेल्या माहितीनुसार, काळेपडळ पोलीस स्टेशन हद्दीत काही युवक ट्रिपल सीट दुचाकीवरून जात असताना पोलिसांनी त्यांना अडवून पोलिस ठाण्यात आणले. नियमानुसार दंड आकारून सोडण्याऐवजी संबंधित



युवकांना दिवसभर पोलिस ठाण्यात बसवून ठेवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या युवकांपैकी एक विद्यार्थी जेएसपीएम कॉलेजमध्ये शिक्षण घेत असून त्याची त्या दिवशी महत्त्वाची प्रॅक्टिकल परीक्षा होती. वारंवार विनंती करूनही त्याला परीक्षेला जाऊ दिले नसल्याचा आरोप आरपीआय पदाधिकाऱ्यांनी केला आहे. यामुळे विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झाले असून त्याच्यावर मानसिक तणाव निर्माण झाल्याचेही सांगण्यात आले.

यासंदर्भात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष महादेव कांबळे, आशिष आल्हाट, रामभाऊ कर्वे, भरत जाधव, महादेव सकाटे यांच्या नेतृत्वाखाली डीसीपी कार्यालयासमोर आंदोलन करून निवेदन देण्यात आले होते. मात्र, तरीही काळेपडळ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ अधिकारी एपीआय अमित शेटे यांना पाठीशी घालत असल्याचा गंभीर आरोप आरपीआय पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

सदर विद्यार्थ्याला परीक्षेला वेळेवर जाऊ दिले नाही, दिवसभर पोलिस ठाण्यात ठेवण्यात आले आणि मारहाण झाल्याने त्याच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत विद्यार्थ्याने टोकाचे पाऊल उचलल्यास त्यास जबाबदार कोण, असा संतप्त सवाल आरपीआयच्या पुणे शहर पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला आहे.

## शेटफळ तलावावरील अवैध उपसा थांबणार

बावडा (दै. संध्या)

"शेटफळ हवेली (ता. इंदापूर) तलावावरील ४४ पाणी उपसा परवाने रद्द करण्याचा निर्णय महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या तीन सदस्यीय लवादाने दिला. त्यामुळे तलावाच्या लाभक्षेत्राखालील १० गावांमधील शेतकऱ्यांना न्याय मिळाला आहे," अशी माहिती शेटफळ तलाव बचाव कृती समितीचे अध्यक्ष प्रा. पंडित पाटील यांनी दिली. सदरचे अवैद्य पाणी परवाने रद्द करणे संदर्भात शेटफळ तलाव बचाव कृती समितीने गेली सात वर्ष लढा दिला. जलसंपदा विभागाने सन २०१४ मध्ये प्रसिद्ध केलेल्या जाहीर प्रकटनानुसार थेट शेटफळ तलावातून पाणी उपसा करण्याचे ४८ पाणी उपसा परवाने दिले होते. त्यामुळे शेटफळ तलावाच्या लाभक्षेत्रातील १० गावांमधील शेतकरी जे गेल्या १०० वर्षापासून पाट पाण्याने शेतातील पिके भिजवत होते, त्यांची शेती ही तलावातून प्रचंड प्रमाणावरती पाणी उपसा होऊन पाण्याअभावी धोक्यात येणार होती. त्यामुळे शेटफळ तलाव बचाव कृती समितीच्या माध्यमातून या तलावावरील ९ पाणी वापर संस्था व लाभार्थी शेतकरी पंडित पाटील विरूध्द ४८ पाणी उपसा परवानाधारक शेतकरी असा कायदेशीर लढा सुरू होता.

ते पुढे म्हणाले की, यासंदर्भात आमची तक्रार प्रथम चार वर्षे प्राथमिक वादविवाद निवारण अधिकारी (पी.डी.आर.ओ.) यांच्या समोर जलसिंचन भवन पुणे येथील चालली. याचा निकाल मे २०२३ मध्ये लागला.

## किल्ले शिवनेरीवर मध्यरात्री चेंगराचेंगरी : शिवभक्त जखमी



जुन्नर (दै. संध्या)

शिवनेरी किल्ल्यावर शिवजयंतीनिमित्त जमलेल्या प्रचंड गर्दीमुळे चेंगराचेंगरीसदृश स्थिती निर्माण झाली. या घटनेत महिला आणि लहान मुलांसह अनेकजण जखमी झाले.

जुन्नर येथील शिवरायांचे जन्मस्थान असलेल्या ऐतिहासिक शिवनेरी गडावर दरवर्षी शिवजयंतीला लाखो शिवभक्त येतात, यावर्षीही राज्यभरातून शिवज्योत घेऊन येणारे तरुण, विविध संघटनांचे कार्यकर्ते आणि शिवभक्त मध्यरात्रीपासूनच शिवनेरीवर दाखल झाले होते व गडाचा परिसर 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.

मात्र मध्यरात्री गडावर क्षमतेपेक्षा जास्त गर्दी झाल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली.गडावरील अंबरखाण्याच्या खालच्या हत्ती दरवाजा परिसर आणि गणेश दरवाजा हे मार्ग अत्यंत अरुंद आहेत. या अरुंद मार्गांवर एकाच वेळी हजारो शिवभक्त जमा झाले. इथं गडावरून खाली उतरणाऱ्या लोकांचा लोंढा मोठा होता. तर खालून गडावर जाणाऱ्या लोकांसाठी जागाच उरली नाही, अशा स्थितीत वरुन खालच्या दिशेनं येणाऱ्या काही लोकांनी ढकलाढकली केली. रस्ते लहान आणि लोकांची संख्या प्रचंड असल्याने येथे चेंगराचेंगरी होऊन, काही शिवभक्त खाली पडले

यामध्ये १५ ते २० शिवभक्त जखमी झाल्याची माहिती आहे. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. घटना घडल्यानंतर जखमींना तातडीने गडाखाली आणून जुन्नर येथील शासकीय रुग्णालय आणि मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

सध्या जखमीची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी गडावर पुरेशी यंत्रणा तैनात नव्हती, यामुळे हा प्रसंग घडल्याचा दावा केला जात आहे. शिवजयंतीच्या उत्साहात अशाप्रकारची घटना घडल्याने हळहळ व्यक्त होत आहे. शिवभक्तांची अभूतपूर्व गर्दी उसळली.व या गर्दीचे नियोजन कोलमडल्याने गडावर चेंगराचेंगरीची मोठी घटना घडली.

शिवजयंतीसारख्या मोठ्या उत्सवावेळी दरवर्षी मोठी गर्दी होत असल्यानं भविष्यात योग्य गर्दी नियंत्रण, प्रवेश-निर्गमन मार्गांचे नियोजन आणि पुरेसा पोलीस बंदोबस्त हा अगोदरच्या दिवसांपासूनच गडावर ठेवणं गरजेचं आहे.

याबाबत संदीप सिंग गिल, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना म्हणाले की, शिवजयंती निमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो शिवभक्त शिवनेरी किल्ल्यावर दाखल झाले. पहाटे ३.३० च्या सुमारास मीना दरवाजाजवळ एक ग्रुप वेगाने खाली उतरत होता. तिथे सहा जणांची पोलिसांची टीम होती.

पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला मात्र वरुन कोणीतरी धक्का दिल्याने काही लोक खाली पडले. यात काही लोक जखमी झाले. परिस्थिती नियंत्रणात असून अफवांवर विश्वास ठेवू नका असं आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले.



# नीरा येथे शिवजयंती उत्सवाला प्रारंभ

नीरा (दै. संध्या)

स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुरंदर तालुक्यातील नीरा येथे शिवजयंती उत्सवाला उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात करण्यात आली. गावातील मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून तसेच श्रीफळ फोडून उत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. देशभरात आज छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या जल्लोषात साजरी होत असून महाराष्ट्रातील गावागावांत तरुणाई विशेष उत्साहाने या सोहळ्यात सहभागी होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर नीरा येथे सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास छत्रपतींच्या पुतळ्याजवळ अभिवादन कार्यक्रम पार पडला. उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून महाराजांना अभिवादन केले.

नीरेच्या माजी सरपंच तेजश्री काकडे, सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष वसंतराव दगडे तसेच ज्येष्ठ विधीतज्ञ आदेश गिरमे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती दत्ता चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य विराज काकडे, माजी उपसरपंच राजेश काकडे, कुमार मोरे, कल्याण जेधे, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य प्रमोद काकडे, संदीप धायगुडे, अनंता शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, पिंगोरीचे पोलिस पाटील राहुल शिंदे, कर्नलवाडीचे माजी उपसरपंच भरत निगडे तसेच नीरा पोलिस दूरक्षेत्राचे संदीप मदने यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित तरुणांनी "छत्रपती शिवाजी महाराज की जय" अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. पारंपरिक पद्धतीने आणि उत्साही वातावरणात कार्यक्रम पार पडल्याने संपूर्ण गावात शिवमय वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हा उत्सव तीन दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांनी रंगणार असून २० फेब्रुवारी रोजी पारंपरिक वाद्यांच्या गजरात भव्य मिरवणुकीने उत्सवाची सांगता करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा जागर समाजात रुजवण्याचा आणि युवकांना प्रेरणा देण्याचा संदेश या उत्सवाच्या माध्यमातून देण्यात येत असल्याचेही यावेळी मान्यवरांनी सांगितले.

# राज्यात शेतकरी आत्महत्या प्रतिबंधासाठी राज्यस्तरीय टास्क फोर्सची स्थापना

## आंतरराष्ट्रीय कृषी समाजशास्त्र डॉ. विनायक हेगाणा यांची विशेष सदस्य म्हणून नियुक्ती : महाराष्ट्र राज्य ठरले पहिले राज्य

पुणे (दै. संध्या)




राज्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी तसेच हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तींच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या मानसिक, सामाजिक व आर्थिक समस्यांवर प्रभावी उपाययोजना राबवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कृषी विभागांतर्गत राज्यस्तरीय टास्क फोर्स स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या टास्क फोर्सवर शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्य क्षेत्रात मागील दहा वर्षांपासून कार्यरत असलेले कृषी धोरणातील तज्ञ संशोधक, कृषी समाजशास्त्र डॉ. विनायक हेगाणा यांची विशेष सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

कृषी आयुक्त सूरज मांढरे यांच्याकडून जारी करण्यात आलेल्या शासन परिपत्रकानुसार, या टास्क फोर्सचे अध्यक्ष रफिक नाईकवाडी संचालक विस्तार प्रशिक्षण अध्यक्षतेखाली सुनील बोरकर, उदय देशमुख, गणेश घोरपडे, जीवन बुंदे, नंदकिशोर नाईनवाड, सत्यजित शितोळे, सोनाली शिळकर हे शासकीय सदस्य म्हणून तर सृष्टी डोईजड या अशासकीय सदस्य म्हणून आपले योगदान देणार आहेत. टास्क फोर्समार्फत शेतकरी आत्महत्यांची आर्थिक, सामाजिक व मानसिक कारणमीमांसा, हवामान बदलांचे परिणाम, अल्पकालीन व दीर्घकालीन धोरणात्मक उपाय, तसेच एकात्मिक हस्तक्षेप मॉडेल विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे.

डॉ.विनायक हेगाणा हे शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी विकसित करण्यात आलेल्या 'पिरॅमिड मॉडेल'चे जनक असून त्यांनी 'शिवार संसद' आणि 'शिवार हेल्पलाइन'सारख्या उपक्रमांद्वारे आतापर्यंत २,४९८ शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त केले आहे. आत्महत्याग्रस्त कुटुंबांतील महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठीही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. नुकतेच,डॉ. हेगाणा यांना त्यांच्या कार्यासाठी डंस्टर बिझनेस स्कूल, स्वित्झर्लंड येथून सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली असून, ते हा सन्मान मिळवणारे देशातील पहिले कृषी पदवीधर संशोधक ठरले आहेत. याशिवाय, ब्रिटिश सरकारच्या प्रतिष्ठेच्या चेव्हनिग ग्लोबल पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले आहे.

या नियुक्तीबाबत बोलताना डॉ. हेगाणा म्हणाले, "शासनाने कृषी आयुक्त सुरज मांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली दिलेली ही जबाबदारी शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी धोरणात्मक पातळीवर काम करण्याची मोठी संधी आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी शाश्वत व प्रभावी मॉडेल उभे करता येईल."

राज्यस्तरीय टास्क फोर्सच्या स्थापनेमुळे शेतकरी आत्महत्या प्रतिबंधासाठी समन्वयित, वैज्ञानिक आणि मानवी दृष्टिकोनातून उपाययोजना राबवण्यास गती मिळणार असल्याची अपेक्षा तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

शेतकरी आत्महत्या हा केवळ आत्महत्येनंतर नुकसानभरपाई देण्याचा विषय नाही. शेतकऱ्याला कशा पद्धतीने अधिक सक्षम करता येईल, या दृष्टीनेही या विषयाकडे पाहणे गरजेचे आहे. त्यासाठी कृषी विभागातील सर्व योजना, उपक्रम यांची समन्वय इतर विभागांशी घालून अधिकाधिक प्रभावी पद्धतीने उत्पादन वाढीसोबतच उत्पन्न वाढीसाठीही प्रयत्न करणे शक्य व्हावे म्हणून हा टास्क फोर्स तयार करण्यात आला आहे. **- सूरज मांढरे, कृषी आयुक्त**

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी अनेक समित्यांनी उपाययोजना सुचवल्या, अभ्यास केला. या सर्वांचा अभ्यास आणि बदलत्या काळानुसार गरजेच्या उपाययोजना अधिक व्यापक पद्धतीने राबविण्यासाठी काम करण्यात येणार आहे. **- रफिक नाईकवडी, संचालक, विस्तार आणि प्रशिक्षण, कृषी विभाग**

आतापर्यंत 'शिवार संसद' आणि 'शिवार हेल्पलाइन'द्वारे अडीच हजार शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त केले. आता या कृतिदलात शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी धोरणात्मक पातळीवर काम करण्याची संधी मिळाली आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी शाश्वत, वैज्ञानिक आणि मानवी दृष्टिकोनातून प्रभावी मॉडेल उभे करता येईल. तसेच शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीच्या उपाययोजनांना गती मिळेल. **- डॉ. विनायक हेगाणा, टास्क फोर्सचे सदस्य**

### टास्क फोर्सचे उद्देश

- शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा अभ्यास आणि संशोधन
- हवामान बदलामुळे शेतीवर होणाऱ्या परिणामांचा आढावा घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणे
- शेतकरी आत्महत्या प्रतिबंधासाठी धोरणात्मक उपयोजना
- शेतीचे तंत्रज्ञान, आर्थिक साहाय्य, सामाजिक आधार आणि मानसिक आरोग्यावर आधारित एकात्मिक पद्धती विकसित करणे
- आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीच्या काळातील तातडीच्या उपाययोजना आणि आपत्तीनंतरच्या पुनर्वसनासाठी विशेष कृती कार्यक्रमाची निर्मिती
- विभागीय आणि जिल्हास्तरावरील अंमलबजावणीसाठी कृती आराखडा तयार करणे
- विविध शासकीय, निमशासकीय आणि स्वयंसेवी संस्थांशी समन्वय साधणे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### युवा पिढीने व्यसनांपासून दूर राहावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते शैलेंद्र बेल्हेकर

हडपसर (दैनिक संध्या) : उच्चशिक्षित युवापिढी व्यसनांच्या आहारी जाऊन आपले आयुष्य उध्वस्त करीत आहेत या पिढीला वाचवण्यासाठी व्यसनमुक्ती जनजागृती अभियान राबविण्याची गरज आहे असे अरुणदादा बेल्हेकर युवा राष्ट्रनिर्माण संस्थचे अध्यक्ष शैलेंद्र बेल्हेकर यांनी सांगितले. साडेसतरा नळी येथे शिवजयंती उत्सवाच्या निमित्ताने अरुणदादा बेल्हेकर युवा राष्ट्रनिर्माण संस्था व ज्ञानप्रबोधिनी माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने व्यसनमुक्ती जनजागृती अभियान फेरी काढण्यात आली होती त्यावेळी बेल्हेकर बोलत होते शाळेचे संस्थापक रतन माळी, मुख्याध्यापक स्मिता वाघ, दिलवरसिंग पावरा,दिपाली कांबळे,कल्पना कोल्हे,ओजस बेल्हेकर,सुशीला मगर,आशा पाटील,अर्चना गायकवाड आदिजण उपस्थित होते. व्यसनमुक्ती जनजागृती संदेश देणारे फलक हातात घेऊन परिसरात फेरी काढण्यात आली विद्यार्थ्यांनी शिवकालीन पारंपारिक वेशभूषा केलेली होती नृत्य,लेझीम, भाषणकला कार्यक्रम यावेळी सादर करण्यात आला बेल्हेकर पुढे म्हणाले छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून सर्व युवापिढीने एकत्र येऊन आयुष्यभर निर्व्यसनी राहण्याची शपथ घेतली तर ती खरी महाराजांना मानवंदना ठरेल.

### संविधान जागृती प्रश्नमंजूषा उपक्रमात जावळकर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या संविधान जागृती प्रश्नमंजूषा २०२५-२६ या उपक्रमांतर्गत ऑनलाईन संविधान प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत आयोजित विशेष सत्रात प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीश न्या. एम. एस. जावळकर (नागपूर खंडपीठ) यांनी विद्यार्थ्यांना संविधान विषयक मार्गदर्शन केले. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांच्या पुढाकारातून आयोजित संविधान जागृती प्रश्नमंजूषा २०२५-२६ या राज्यव्यापी उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. संविधानाबद्दल सखोल ज्ञान, लोकशाही मूल्यांची जाणीव आणि सामाजिक न्यायाची बांधिलकी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी नागपूर येथील डॉ. कैलास वसावे, डॉ. दिविता कोठेकर, डॉ. आरती तायडे, डॉ. व्ही. पी. तिवारी तसेच महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी मुंबई येथील डॉ. जगदीश खोब्रागडे, डॉ. साहिली सुरजुसे व डॉ. अमोल चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. न्या. श्रीमती एम. एस. जावळकर यांनी विद्यार्थ्यांना संविधान विषयक अमूल्य मार्गदर्शन केले. त्यांनी भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार, कर्तव्ये, समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. या विशेष सत्रात न्या. आर. सी. चव्हाण, न्या. पृथ्वीराज चव्हाण, माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित तसेच माजी आयुक्त समाज कल्याण इ. झेड. खोब्रागडे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनाल अ. थुल यांनी केले. कार्यक्रमास डॉ. जगदीश खोब्रागडे, डॉ. साहिली सुरजुसे व डॉ. आरती तायडे यांची उपस्थिती लाभली. विशेष म्हणजे राज्यातील विद्यार्थिनींचा मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविण्यात आला.

### आयआयएमएसमध्ये शिवजयंती साजरी

पिंपरी(दैनिक संध्या) : यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स (आयआयएमएस ) मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात त्यांच्या जीवन चरित्राची उदाहरणे देत शौर्य, दूरदृष्टी, नेतृत्व आणि मूल्यांचे आदर्श अधोरेखित करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, नैतिक नेतृत्व आणि सामाजिक जबाबदारीची भावना जागृत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमाला व्याख्याते प्रा.डॉ.सुनिल रुपचंद धनगर, डॉ. वंदना मोहंती आणि डॉ. अश्विनी ब्रह्मे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रा.डॉ.सुनिल रुपचंद धनगर यांनी विशेष व्याख्यान देत शिवाजी महाराजांच्या रणनीतिक विचारसरणी, प्रशासनिक कौशल्य, लोकाभिमुख शासन आणि नैतिक मूल्यांवर प्रकाश टाकला. त्यांच्या प्रेरणादायी भाषणाने विद्यार्थ्यांना हे तत्त्वज्ञान आपल्या शैक्षणिक व व्यावसायिक जीवनात आत्मसात करण्यास प्रेरित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एमबीए प्रथम वर्षातील विद्यार्थिनी कु. विधी कोठारी आणि कु. अनुष्का काळे यांनी केले. विद्यार्थ्यांसह प्राध्यापक व शिक्षकेतर वर्गाने उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाचा समारोप डॉ. महेश महांकळ यांनी आभार प्रदर्शन करून केला.

## गोबोल्ट-मस्टँग भागीदारीचा विस्तार; ३,००० कोटींच्या महसुलाचे लक्ष्य

पुणे (दै. संध्या)

भारतातील वेअरेबल आणि ऑडिओ क्षेत्रातील वेगाने वाढणाऱ्या ब्रँडपैकी एक असलेल्या गोबोल्टने 'मस्टँग'सोबतची आपली भागीदारी अधिक विस्तारत आर्थिक वर्ष २०२७-२८ पर्यंत ३,००० कोटी रुपयांच्या महसुलाचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. कंपनीने प्रीमियम उत्पादनांवर अधिक लक्ष केंद्रित करत 'मस्टँग' पोर्टफोलिओ ऑडिओ उपकरणांच्या पलीकडे नेण्याचा निर्णय घेतला आहे.



या भागीदारीअंतर्गत कंपनीने तीन स्मार्टवॉचेस स्टॅलियन, रेसर आणि मसल तसेच 'मस्टँग स्प्रिंट' टीडब्ल्यूएस इयरबड्स बाजारात सादर केले आहेत. या नव्या श्रेणीमधून कंपनीच्या प्रीमियमायझेशन धोरणाला अधिक बळ मिळणार असल्याचे सांगितले जात आहे.

आर्थिक वर्ष २०२५ मध्ये सुमारे ८०० कोटी रुपयांचा महसूल गाठल्यानंतर आता पुढील तीन वर्षांत व्यवसाय तीन हजार कोटी रुपयांपर्यंत नेण्याची कंपनीची योजना आहे.

## प्रा. यास्मिन शेख व डॉ. अविनाश चाफेकर यांना जीवनगौरव पुरस्कार

पुणे (दै. संध्या)

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने येत्या 21 व 22 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या आठव्या राष्ट्रभक्ती साहित्य संमेलनामध्ये मराठी भाषेच्या जतनासाठी आपले आयुष्य समर्पण करणाऱ्या ज्येष्ठ मराठी व्याकरण तज्ञ प्रा. यास्मिन शेख यांना "शिक्षणप्रेमी शांतारामशेठ शहासने" जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तर महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचे कार्यवाह डॉ. अविनाश चाफेकर यांना "कवयित्री उर्मिलाताई कराड" जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रकांत शहासने व संयोजिका तेजाली शहासने यांनी आज येथे दिली. "अनुवादातून राष्ट्रभक्ती" या संकल्पनेला वाहिलेले हे संमेलन फिरोदिया ऑडिटोरियम, फर्ग्युसन महाविद्यालय (प्रवेश गेट नं.4), पुणे येथे होणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अनुवादक डॉ. शुचिता फडके असून ज्येष्ठ अनुवादक डॉ. रवींद्र गुर्जर हे संमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत. शनिवारी (21 फेब्रुवारी) सकाळी 10 वाजता खा. डॉ. मेधा कुलकर्णी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. हे संमेलन सर्वांसाठी विनामूल्य खुले असून अनुवादासंबंधीच्या जिज्ञासूंनी, संशोधकांनी तसेच विद्यार्थ्यांनी या संमेलनात अवश्य सहभागी होण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

संमेलनाच्या पहिल्या दिवशी (21 फेब्रुवारी) अनुवादविषयक व्याख्याने व चर्चासत्रांमध्ये विविध मान्यवरांचा सहभाग राहणार आहे. यामध्ये कृत्रिम बुध्दीमत्ता आणि अनुवाद (डॉ. प्रांजली देशपांडे), प्रशासकीय सेवेतील अनुवादाच्या संधी व क्रांतीकारक साधने (सुश्रुत कुलकर्णी), पेटंट व शास्त्रीय अनुवाद (दीपक झेमसे), अनुवादातील खाचाखोचा (विदुला टोकेकर) आणि डॉ. शुचिता फडके यांचे राष्ट्रनिर्मितीसाठी अनुवाद या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. दुसऱ्या दिवशी (22 फेब्रुवारी) सकाळी 10 वाजता ओळख देशभक्तांची या उपक्रमाचा संकल्पपूर्ती समारंभ लोकमान्य मल्टिपर्पज सोसायटीचे अध्यक्ष किरण ठाकून यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे व दुपारी 12 वाजता जीवनगौरव पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. यावेळी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे विवेक भोसले, पर्यावरणप्रेमी डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील, मराठीकाका अनिल गोरे उपस्थित राहणार आहेत. प्रकाशक व साहित्यप्रेमी भालचंद्र कुलकर्णी व प्रा. वैशाली कार्लेकर हे संमेलनाचे निमंत्रक आहेत.

## द स्मार्टर ई इंडिया २०२६ बनला गुजरातचा 'ऊर्जेचा महाकुंभ'

मुंबई (दै. संध्या)

भारताची स्वच्छ ऊर्जा यात्रा आता केवळ लक्ष्यांपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती अंमलबजावणीच्या नव्या टप्प्यात प्रवेशली आहे. अशा वेळी तंत्रज्ञान, उत्पादन आणि धोरणांशी संबंधित संवाद एकाच व्यासपीठावर आणणाऱ्या प्लॅटफॉर्मचे महत्त्व वेगाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर गुजरात — उदयोन्मुख ऊर्जा केंद्र म्हणून — पुन्हा एकदा 25 ते 27 फेब्रुवारीदरम्यान गांधीनगर येथे द स्मार्टर ई चे आयोजन करत आहे. हा कार्यक्रम गुजरातमधील सर्वात मोठ्या स्वच्छ ऊर्जा प्रदर्शनाच्या रूपात स्थापित होत असून उद्योगजगत त्याला 'ऊर्जेचा महाकुंभ' असे संबोधत आहे.

मेस्से मुएनचेन इंडिया चे सीईओ आणि आईएमईए चे अध्यक्ष भूपिंदर सिंह म्हणाले की ऊर्जा क्षेत्रातील चर्चांचे स्वरूप आता बदलले आहे. भारत आता केवळ उद्दिष्टांवर चर्चा करत नाही, तर अंमलबजावणी, पुरवठा साखळी आणि देशांतर्गत उत्पादनातील स्पर्धेवर लक्ष केंद्रित करत आहे. द स्मार्टर ई इंडिया हा बदलच दर्शवतो, त्यामुळे उद्योग त्याला ऊर्जा महाकुंभ मानू लागला आहे.

ट्रेड फेअरमध्ये Innovator and Start-up Arena देखील असेल, जिथे प्रारंभिक टप्प्यातील कंपन्या ऊर्जा साठवण, इलेक्ट्रिक वाहन परिसंस्था, ग्रिड इंटेलिजन्स आणि प्रगत सौर उत्पादनाशी संबंधित तंत्रज्ञान सादर करतील. यासोबत Voices of India Energy Leader – The Smarter E India Podcast Series देखील प्रदर्शनासोबत चालणार आहे.

जागतिक स्तरावरही भारताच्या स्वच्छ ऊर्जा निर्णयांवर लक्ष ठेवले जात आहे. सोलर प्रमोशन इंटरनॅशनल चे व्यवस्थापकीय संचालक फ्लोरियन वेसेंडॉर्फ म्हणाले की मोठ्या प्रमाणावर ऊर्जा परिवर्तन कसे अंमलात आणले जाते याचे जागतिक उदाहरण भारत बनत आहे. येथे होणारे बदल जागतिक पुरवठा साखळी आणि तांत्रिक प्राधान्यांवर प्रभाव टाकतात. द स्मार्टर ई इंडिया मधील वाढती आंतरराष्ट्रीय सहभागिता याच रुचीचे द्योतक आहे.

या आयोजनात 300 हून अधिक प्रदर्शक सहभागी होणार असून ते सौर ऊर्जा, ऊर्जा साठवण, इलेक्ट्रिक मोबिलिटी, पायाभूत सुविधा आणि संपूर्ण ऊर्जा प्रणालींच्या विविध घटकांशी संबंधित असतील. ही व्यापक सहभागिता दर्शवते की भारताचा नवीकरणीय ऊर्जा परिसंस्था आता अशा मंचांभोवती संघटित होत आहे, जिथे तंत्रज्ञान, धोरण आणि व्यावसायिक निर्णय एकत्रितपणे समोर येतात.

कार्यक्रमात 19,000 हून अधिक व्यावसायिक अभ्यागत, 300 हून अधिक विचारवंतांची परिषदेत उपस्थिती आणि 60 हून अधिक आंतरराष्ट्रीय वक्ते सहभागी होणार आहेत. हे तज्ञ विविध मंचांवर — जसे की परिषद: Adoption to Leadership: Powering Atmanirbhar Bharat through Technological Innovation, Voices of India Energy Leader – The Smarter E India Podcast Series आणि Innovator and Start-up Arena — चर्चा करतील. कार्यक्रमाच्या व्यापक प्रभावाचा विचार करून अभिनेते प्रतीक गांधी यांची द स्मार्टर ई इंडिया 2026 चे ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आयोजकांच्या मते, यामुळे स्वच्छ ऊर्जा आता भारताच्या अर्थव्यवस्था, उत्पादन, पायाभूत सुविधा विकास आणि रोजगारनिर्मितीशी घट्टपणे जोडली गेली असल्याचे स्पष्ट होते.

मेजबान राज्य म्हणून गुजरातची निवड भारताच्या नवीकरणीय ऊर्जा प्रवासातील त्याच्या वाढत्या भूमिकेचे प्रतीक आहे. मागील काही वर्षांत गुजरात मोठ्या प्रमाणातील सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्पांसह आत्मनिर्भर भारताच्या उद्दिष्टांशी संबंधित उत्पादन विस्ताराचे प्रमुख केंद्र म्हणून उदयास आले आहे. 2026 आवृत्तीचे मुख्य आकर्षण Adoption to Leadership: Powering Atmanirbhar Bharat through Technological Innovation या विषयावर आधारित परिषद असेल. यात भारत मोठ्या स्वच्छ ऊर्जा बाजारापासून पुढे जाऊन तांत्रिक विकास आणि उत्पादन क्षेत्रात जागतिक नेतृत्व कसे मिळवू शकतो यावर चर्चा होईल.

परिषदेत प्रकल्प विकास, उत्पादन, धोरण आणि आंतरराष्ट्रीय उद्योग संघटनांशी संबंधित तज्ञ सहभागी होतील. चर्चेचे मुख्य विषय उत्पादन विस्तार, ग्रिड एकात्मीकरण, ऊर्जा साठवण, वित्तपुरवठा आणि धोरणात्मक समन्वय असे असतील — जे येत्या दशकात भारताच्या ऊर्जा स्पर्धात्मकतेला आकार देतील.

## आयडीएफसी फर्स्टकडून 'हॅलो कॅशबॅक' एफडी-समर्थित क्रेडिट कार्ड लॉंच

पुणे (दै. संध्या)

आयडीएफसी फर्स्ट बँकेने 'हॅलो कॅशबॅक' क्रेडिट कार्ड बाजारात आणले असून, हे फिक्स्ड डिपॉझिट (FD) आधारित क्रेडिट कार्ड डिजिटल पेमेंट करणाऱ्या ग्राहकांसाठी, विशेषतः १८ वर्षांवरील तरुणांसाठी डिझाइन करण्यात आले आहे. ऑनलाइन-फर्स्ट आणि यूपीआय-आधारित खर्चाच्या सवयी लक्षात घेऊन क्रेडिट अधिक सुलभ करणे आणि क्रेडिट इतिहास तयार करण्यास मदत करणे हा या कार्डचा उद्देश आहे.

या कार्डमध्ये टायर्ड कॅशबॅक स्ट्रक्चर देण्यात आले आहे. दरमहा ₹१०,००० पर्यंतच्या ऑनलाइन खर्चावर ३% कॅशबॅक, त्यापुढील ऑनलाइन खर्चावर ५% कॅशबॅक आणि इन-स्टोअर, कॉन्टॅक्टलेस तसेच यूपीआय व्यवहारांवर १% कॅशबॅक मिळतो. उपयुक्तता, शिक्षण, विमा, FASTag रिचार्ज, रेल्वे बुकिंग, सरकारी पेमेंट, भाडे आदी आवश्यक खर्चांवरही १% कॅशबॅक लागू राहणार आहे. सर्व श्रेणींसाठी एकूण मासिक कॅशबॅक मर्यादा ₹१,५०० ठेवण्यात आली आहे.

हे क्रेडिट कार्ड ₹१०,००० पासून सुरू होणाऱ्या फिक्स्ड डिपॉझिटवर उपलब्ध असून, एफडीच्या १००% पर्यंत क्रेडिट लिमिट दिली जाते. यामुळे ग्राहकांना एफडीवरील व्याजासह कार्डवरील खर्चावर कॅशबॅक असे दुहेरी लाभ मिळतात. आवश्यक असल्यास अतिरिक्त एफडी जोडून क्रेडिट मर्यादा वाढवण्याची सुविधाही देण्यात आली आहे.

या कार्डद्वारे एटीएममधून एफडी मूल्याच्या १००% पर्यंत पैसे काढण्याची सुविधा असून, ४५ दिवसांपर्यंत व्याजमुक्त कालावधी मिळतो. तसेच विमा कव्हर, खरेदी संरक्षण, हरवलेले कार्ड दायित्व संरक्षण, रस्त्याच्या कडेला मदत आणि १% इंधन अधिभार माफी यांसारख्या सुरक्षा व सोयींचाही समावेश आहे.

कार्डची जॉइनिंग फी ₹१,००० + GST असून ३१ मार्च २०२६ पर्यंत ती माफ करण्यात आली आहे. वार्षिक शुल्क ₹१,००० + GST असून, वर्षभरात ₹२ लाख किंवा त्याहून अधिक खर्च केल्यास ते पूर्णपणे माफ होते; ₹१ लाख ते ₹२ लाख खर्चावर ५०% शुल्क माफी दिली जाते.

## ॲक्सिस कॅपिटलची सिग्नेचर ग्लोबल 'खरेदी करण्याची' शिफारस

पुणे (दै. संध्या)




ब्रोकरेज फर्म ॲक्सिस कॅपिटलने सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडसाठी 'बाय' रेटिंग देण्याची शिफारस केली आहे. कंपनीने नुकतीच आरएमझेड सोबत भागीदारीद्वारे व्यावसायिक रिअल इस्टेट क्षेत्रात प्रवेशाचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. हा कंपनीच्या वाढीचा प्रमुख चालक असल्याचा दाखला ॲक्सिस कॅपिटलने दिला आहे.

ॲक्सिस सिक्युरिटीजने कंपनीचे 'बाय' रेटिंग १,३०० रुपयांच्या लक्ष्य किमतीसह कायम ठेवले आहे. या स्टॉकच्या किमतीत २२% पर्यंत वाढ होण्याची शक्यता त्यातून दर्शविण्यात आली आहे. सिग्नेचर ग्लोबलचा शेअर १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सुरुवातीच्या व्यवहाराच्या वेळेत प्रति शेअर १०७०.१० रुपयांवर उघडला.

ॲक्सिस कॅपिटलने त्यांच्या अहवालात सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडवरील 'बाय' शिफारसीमागील खालील घटकांवर प्रकाश टाकला आहे.

सिग्नेचर ग्लोबलने आपल्या विविधीकरण धोरणाच्या अनुषंगाने, दक्षिण भारतातील आघाडीचे लीजिंग ॲसेट डेव्हलपर असलेल्या आरएमझेडसोबत संयुक्त उपक्रमाद्वारे व्यावसायिक रिअल इस्टेट विभागात प्रवेश करण्याची घोषणा केली आहे.

सुमारे ५५ लाख चौरस फूट नियोजित भाडेपट्टा क्षेत्रासह कार्यालय-केंद्रित, संमिश्र वापराच्या ग्रेड-ए मालमत्तेच्या विकासाचा या भागीदारीमध्ये समावेश आहे. कार्यालयीन जागेसोबतच किरकोळ आणि हॉटेल घटकांचाही या प्रकल्पात समावेश असेल.


ही मालमत्ता गुरुग्राममधील सेक्टर ७१ मधील सदर्न पेरिफेरल रोड येथे असेल. सिग्नेचर ग्लोबलकडे कार्यान्वयाची बळकट क्षमता आणि विकासाचा अनुभव आहे, तर आरएमझेड संस्थात्मक दर्जाच्या व्यावसायिक मालमत्तेची संकल्पना आणि विकास करण्यातील तिच्या तज्ज्ञतेचा वापर करेल.

हे बांधकाम पुढील सहा ते नऊ महिन्यांत सुरू होण्याची अपेक्षा असून हा प्रकल्प सुमारे पाच वर्षांत पूर्ण होईल. तो पूर्ण झाल्यानंतर कंपनीला ऑफिस आणि रिटेल विभागांमधून अनुक्रमे प्रति चौरस फूट अंदाजे १२५ रुपये आणि प्रति चौरस फूट २५० रुपये मासिक भाडे मिळण्याची अपेक्षा आहे.

या व्यवहाराचा एक भाग म्हणून आरएमझेड ही सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडच्या पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या गुरुग्राम कॉमर्सिटी लिमिटेडमध्ये (जीसीएल) ५०% इक्विटी हिस्सा मिळवण्याच्या बदल्यात १२.८ अब्ज रुपये गुंतवेल. या कंपनीची एकूण विकासक्षमता सुमारे ७५ लाख चौरस फूट एवढी आहे. त्यापैकी जवळजवळ ७०% (अंदाजे ५५ लाख चौरस फूट) व्यावसायिक विकासासाठी राखीव आहे, तर उर्वरित क्षेत्र निवासी वापरासाठी नियुक्त केले आहे.

"या मालमत्तेसाठी अजून पाच वर्षे बाकी आहेत. त्यामुळे, आर्थिक वर्ष २८ पूर्वीपर्यंत आमच्या महसूल/कमाईच्या अंदाजांवर तिचा परिणाम होईल, असे आम्हाला वाटत नाही. या व्यवहारात जमिनीचे मूल्य २६ अब्ज रुपये असल्याचे सूचित केले असले तरी आम्ही ३४ अब्ज रुपयांचे विकासमूल्य निश्चित केले आहे. भांडवली खर्च आणि भविष्यातील सवलती यांचा विचार करता ते वाजवी वाटते. आम्ही आमचा टीपी रु. १३०० एवढा कायम ठेवला आहे," असे ॲक्सिस कॅपिटलने त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### योगेंद्र कुंटे यांचे निधन

पुणे (दैनिक संध्या) : एमईएस ऑडिटोरियमचे माजी व्यवस्थापक योगेंद्र कुंटे यांचे निधन झाले. कला क्षेत्रातील एक निष्ठावान आणि कर्तव्यदक्ष व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. ते ६० वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, भाऊ असा परिवार आहे. एमईएस ऑडिटोरियममध्ये कार्यरत असताना त्यांनी अनेक सांस्कृतिक कार्यक्रम, नाट्यप्रयोग व संगीत मैफिलींचे यशस्वी व्यवस्थापन केले. कलाकार, आयोजक आणि प्रेक्षक यांच्यात समन्वय साधत कार्यक्रम शिस्तबद्धपणे पार पाडण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. कला क्षेत्राबरोबरच त्यांचा ट्रेकिंग व निसर्गभ्रमंतीकडे विशेष ओढा होता. साहसी प्रवास, किल्लेभ्रमंती आणि ट्रेकिंग क्षेत्रातही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. निसर्गाबद्दलचा आदर, शिस्त आणि सुरक्षिततेचे महत्त्व त्यांनी नेहमीच अधोरेखित केले.



### आदर्श माता केशरबाई पवार यांचे निधन

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : खोपोडी येथील आदर्श माता कै.केसरबाई किसनराव पवार यांचे वयाच्या ८० व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्याच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विश्वासराव - प्रमोद किसनराव पवार यांच्या मातोश्री आहे तर युवा उद्योजक किरण भोसले यांच्या आझसासु आहे.



### शिवरायांच्या जयघोषात रंगला ध्यासमध्ये शिवजयंती सोहळा

आळंदी (दैनिक संध्या) : ध्यास फौंडेशन संचलित महर्षी वाल्मिकी बालक मंदिर, महर्षी वाल्मिकी विद्यावर्धिनी व डॉ.माधवराव सानप विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची मिरवणूक काढून व शिवगर्जनेने करण्यात आली. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या संचालिका अक्षता कुलकर्णी, व्यवस्थापक गोपाल उंबरकर व ज्येष्ठ शिक्षिका विद्या खराडे उपस्थित होत्या. शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करून कार्यक्रमाला प्रारंभ झाला. प्रास्ताविकात अक्षता कुलकर्णी यांनी शिवाजी महाराजांची दूरदृष्टी, पराक्रम, न्यायनीती व धर्मरक्षणाची भूमिका यांचा उल्लेख करत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचे अनुकरण करावे, असे आवाहन केले. वाईट प्रवृत्तींवर मात करून यश संपादन करण्याचा संदेश त्यांनी दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी शिवकालीन मावळ्यांच्या व्यक्तिरेखा सादर करत कार्यक्रमात रंगत आणली. तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, शिवा काशिद, महाराणी ताराबाई, जिवा महाला, हंबीरराव मोहिते, निराजी रावजी तसेच धर्मवीर संभाजी महाराज यांच्या भूमिका विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे साकारल्या. त्यांच्या संवादातून शौर्य, निष्ठा आणि स्वराज्यनिष्ठेचा संदेश अधोरेखित झाला. यानंतर विद्यार्थ्यांनी लाठी-काठीचे प्रात्यक्षिक सादर करत उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी शिर्के यांनी केले, तर आभार प्रदर्शन विद्या खराडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### इंदापूरमधील वीज भारनियमन तात्पुरते खंडीत

इंदापूर (दैनिक संध्या) : इंदापूर तालुक्यातील सिंगल फेज फिडरवर रात्रीच्या वेळी करण्यात येणारे सुमारे १६ तासांचे भारनियमन तात्पुरते खंडीत केले आहे. रात्रीच्या वेळी फिरडवर वाढलेला भार कमी करण्यासाठी वीज वितरण कंपनीने प्रयत्न सुरू केले आहेत. शेती पंपाना दिवसा ८ तास वीजपुरवठा करण्याबरोबर रात्रीच्या वेळी सिंगल फेजच्या माध्यमातून घरगुती वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याचे नियोजन केल्याने, सध्या तालुक्यातील विद्यार्थी व नागरिकांना दिलासा मिळाला आहे. बारामती विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी १६ फेब्रुवारीला लेखी पत्राद्वारे उपविभागांना सिंगल फेजवरील भार कमी करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. दिवसभराच्या वापराच्या तुलनेत रात्रीच्या वीज वापराचा भार २० टक्क्यांपर्यंत ठेवण्याचे सांगितले होते. वीस टक्क्यांपेक्षा अधिकचा भार वाढल्यास वीज पुरवठा बंद ठेवण्यात येत होता. याची प्रभावी अंमलबजावणी करण्यास गेल्या दोन दिवसांपासून सुरुवात झाली.

# सासवडमध्ये शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा

**सासवड (दै. संध्या)**

अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सासवड शहर आणि परिसरात अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. सासवडच्या 'शिवतीर्था'वर शिवप्रेमींनी मोठी गर्दी केली होती, तर नगरपालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या 'शिवसृष्टी'मधील ऐतिहासिक प्रदर्शनाने शिवभक्तांचे लक्ष वेधून घेतले.

गुरुवारी सकाळी सासवडच्या शिवतीर्थावरील अश्वारूढ पुतळ्यास माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांच्यासह नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप, सोपान रणपिसे, राजन जगताप, प्रदीप राऊत, ज्ञानेश्वर गिरमे, नगरसेविका स्मिता उमेश जगताप, प्रियांका साकेत जगताप, स्मिता सुहास जगताप, लिना सौरभ वढणे, अर्चना चंद्रशेखर जगताप, शितल प्रविण भोंडे तसेच बाजीराव जगताप, नंदकुमार जगताप, सागर जगताप आदींनी शिवछत्रपतींच्या अश्वारूढ आणि पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. शिववंदना आणि जयघोषाने संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. शहरातील सरसेनापती बाजी पासलकर, सरदार गोदाजीराजे जगताप, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांनाही पालिकेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. माजी आमदार संजय जगताप यांच्या कल्पक मार्गदर्शनाखाली उभारण्यात आलेल्या ऐतिहासिक वस्तू प्रदर्शनाचे (शिवसृष्टी) उद्घाटन मोठ्या उत्साहात झाले. या प्रदर्शनात शिवरायांचा जन्मसोहळा, राज्याभिषेक सोहळा, सिंहासनावरील पूर्णाकृती पुतळा, राजमुद्रा आणि शिवकालीन शस्त्रास्त्रांचे दालन पाहण्यासाठी सासवडकर नागरिक, तरुण आणि मुलांनी झुंबड उडवली होती. माहितीपूर्ण चित्रफिती आणि ऐतिहासिक चित्रणांमुळे याठिकाणी जणू शिवशाही अवतरल्याचा भास होत होता.




बुधवारी मध्यरात्रीपासूनच पुरंदर किल्ल्याचा रस्ता गजबजला होता. जिल्ह्यातील विविध गावांतील हजारो तरुणांनी किल्ल्यावरून शिवज्योत नेण्यासाठी गर्दी केली होती. भगवे झेंडे आणि ढोल-ताशांच्या गजरात गुरुवारी दिवसभर संपूर्ण सासवड शहर शिवमय झाले होते. शिवजयंतीचे औचित्य साधून स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप यांच्या वतीने सध्या आजारपणामुळे अंथरुणावर खिळून असलेले ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते शरद ख्रिस्ती यांच्या कुटुंबाला 'किराणा किट' देऊन मदतीचा हात देण्यात आला.

## स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानच्यावतीने कामगारांना जीवनावश्यक वस्तू व कपड्यांचे वाटप

**जेजुरी (दै. संध्या)**

सामाजिक बांधिलकी जपत स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठान यांच्या वतीने पिसर्वे व सासवड परिसरातील १५० ऊस तोडणी कामगारांसाठी किराणा किट, ब्लँकेट व महिलांना साडी वाटपाचा उपक्रम पार पडला.

ऊस तोडणी कामगार हे दरवर्षी स्थलांतर करून कष्टाचे जीवन जगत असतात. कठोर परिश्रम करूनही त्यांना अनेक आर्थिक व सामाजिक अडचणींना सामोरे जावे लागते. वाढती महागाई, अस्थिर उत्पन्न व कुटुंबाच्या गरजा यामुळे त्यांच्या अडचणी अधिक वाढतात. ही परिस्थिती लक्षात घेऊन प्रतिष्ठानच्या वतीने हा मदत उपक्रम राबविण्यात आला.

वाटप करण्यात आलेल्या किराणा किटमध्ये तांदूळ, गहू पीठ, साखर, डाळी, तेल, मीठ तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंचा समावेश होता.

महिलांना साडी वाटप करून त्यांचा सन्मान करण्यात आला. या उपक्रमामुळे कामगार कुटुंबांना दिलासा मिळाल्याची भावना लाभार्थींनी व्यक्त केली.



कार्यक्रमाच्या वेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, सोमेश्वर सहकारी साखर कारखाना शेती अधिकारी नंदकुमार कामथे, उपसरपंच पिसर्वे चंद्रकांत कोलते, मारुती कोलते,चिट बॉय अक्षय कोलते, सासवड चीट बॉय अजित इंगळे उपस्थित होते. “समाजातील गरजू घटकांना मदत करणे हीच स्व. एकनाथकाका जगताप यांना खरी आदरांजली आहे,” असे मत नंदकुमार कामथे यांनी व्यक्त केले. भविष्यातही शिक्षण, आरोग्य व सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी गावातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी जाणून घेतला शिवकालीन सागरी सामर्थ्याचा वारसा

**पुणे (दै. संध्या)**

■ आदर्श शिक्षण मंडळी, पुणे या शिक्षण संस्थेच्या सौ.सुशीलाबाई वीरकर हायस्कूल तसेच नातूबाग शैक्षणिक संकुल, माजी विद्यार्थी सन २००० बॅच आणि सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने शिवकालीन आरमार प्रदर्शनाचे आयोजन

शिवकालीन सागरी आरमार... जहाजांची रचना, सागरी किल्ले व शस्त्रसामग्री यांची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना सांगण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दूरदृष्टीतून उभारलेल्या आरमारामुळे स्वराज्याची सागरी सीमा सुरक्षित झाली आणि परकीय आक्रमणांना प्रभावी उत्तर देता आले. यावेळी वापरण्यात आलेले नौका, तोफा, शस्त्रांच्या प्रतिकृतींचे प्रदर्शन पाहत विद्यार्थ्यांनी सागरी शिवकालीन सागरी सामर्थ्य जाणून घेतले.



शुक्रवार पेठेतील आदर्श शिक्षण मंडळीच्या सौ. सुशीलाबाई वीरकर हायस्कूल तसेच नातूबाग शैक्षणिक संकुल, माजी विद्यार्थी सन २००० बॅच आणि सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती सोहळा २०२६ निमित्त १७ व १८ फेब्रुवारी रोजी प्रशालेच्या प्रांगणात ‘शिवकालीन सागरी आरमार व शस्त्रांचे दुर्मिळ प्रदर्शन’ आयोजित करण्यात आले आहे. यावेळी उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. मिलिंद भोई, प्रमुख पाहुणे माजी शिक्षण अधिकारी , समुपदेशक डॉ. अनिल गुंजा, वीरकर हायस्कूलचे प्रभारी मुख्याध्यापक महादेव माने, आदर्श विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापिका अनुजा देवभानकर, आदर्श प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निलिमा लांजेवार, नगरसेविका स्नेहा माळवदे उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमावेळी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. प्रदर्शन सकाळी ९ ते सायंकाळी ७ यावेळेत खुले आहे. विद्यार्थ्यांना इतिहास विषयाची गोडी लागावी, प्रत्यक्ष शस्त्रसामग्री पाहण्याची संधी मिळावी आणि महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाबद्दल जागरूकता वाढावी या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रदर्शनात शिवकालीन जहाजांची मॉडेल्स, तोफा, तलवारी, ढाली तसेच सागरी किल्ल्यांची माहिती दृश्य स्वरूपात मांडण्यात आली आहे. डॉ. मिलिंद भोई म्हणाले, समाजाचा आधार शिक्षक आहेत. निरागस मुले शिक्षकांकडे आदर्श म्हणून पाहतात. त्यामुळे शिक्षकांवर मोठी जबाबदारी असते. माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी राबविलेला स्वराज्याचे आरमार प्रदर्शन उपक्रम अत्यंत सुंदर असून इतिहास केवळ पुस्तकांपुरता मर्यादित न राहता प्रत्येक घरापर्यंत पोहोचला पाहिजे.

डॉ. अनिल गुंजाळ म्हणाले, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार, जातीयता, व्यसनाधीनता आणि आत्महत्या या पाच गोष्टी टाळल्या तर छत्रपतींनी साकारलेले स्वराज्य अधिक सक्षम राहील. शिक्षकांचे योगदान अमूल्य असून त्यांनी घडवलेले माजी विद्यार्थी हीच त्याची साक्ष आहे.

नगरसेविका स्नेहा माळवदे यांनी मनोगत व्यक्त केले.

# विश्वातील सर्वात मोठी शिवजयंती पुण्यात; अवतरली शिवशाही

## शिवरायांना सरदारांच्या वंशजांकडून भव्यदिव्य मानवंदना; शिवजयंती महोत्सव समिती पुणे तर्फे आयोजन

**पुणे (दै. संध्या)**

तिरुपती बालाजीची फुलांची आकर्षक सजावट असलेला जिजाऊ मॉंसाहेब शहाजी महाराज शिवज्योत मुख्य स्वराज्यरथ... एकापाठोपाठ येणारे सरदारांचे, मावळ्यांचे, वीर मातांचे स्फुर्ती देणारे ९६ स्वराज्यरथ... महाराणी ताराराणी शौर्य पथकातील ५१ रणरागिणींच्या मर्दानी खेळांची चित्तथरारक मानवंदना... ५१ रणशिंगांची ललकारी... नादब्रह्म ट्रस्ट ढोल ताशा पथकाचा रणगजर... सनई-चौघडयांचे मंगलमय सूर... लाखोंच्या संख्येने पारंपरिक पोशाखात उपस्थित महिला... आणि शिवभक्तांनी केलेला जय शिवाजी जय भवानीचा जयघोष अशा पवित्र वातावरणात शिवकाल पुनःश्च एकदा पुण्यामध्ये अवतरला. निमित्त होते, शिवजयंती महोत्सव समिती पुणे तर्फे लालमहाल येथून आयोजित शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ सोहळा या भव्यदिव्य मिरवणुकीचे. मिरवणूकीचे उद्घाटन




नागरी विमान वाहतूक केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, समितीचे संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड, पोलीस उपायुक्त कृषीकेश रावले, आमदार हेमंत रासने तसेच सर्व स्वराज्यघराण्यांचे प्रतिनिधी यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी श्रीमंत दगडुशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने तसेच सर्व स्वराज्यघराण्यांचे प्रतिनिधी यांच्या हस्ते लालमहालातील जिजाऊंच्या पुतळयाला पुष्पहार घालून जिजाऊ मॉंसाहेब शहाजी महाराज शिवज्योत रथावरील शिवज्योत प्रज्वलन करीत मिरवणुकीला सुरुवात झाली. मिरवणुकीचे यंदा १४ वे वर्ष आहे.

भारताच्या इतिहासातील शिवकालीन युध्दकला सादर करणाऱ्या ५१ रणरागिनींच्या औरंगासुर मर्दिनी भद्रकाली रणरागिनी महाराणी ताराराणी शौर्य पथक मर्दानी युध्दकला सादर केली. नादब्रह्म ढोल ताशा पथकाच्या जल्लोषपूर्ण वादनाने वातावरण मंत्रमुग्ध झाले. सोहळ्याचे आयोजन समितीचे प्रवर्तक संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड, सचिन पायगुडे, रवींद्र कंक, शंकर कडू, नीलेश जेधे, गोपी पवार, समीर जाधवराव, प्रवीणभैय्या गायकवाड, किरण शितोळे, मोहन पासलकर, मयुरेश दळवी यांसह असंख्य स्वराज्यबांधवांनी केले होते.

मिरवणुकीत मानाचा मुख्य रथ जिजाऊ मॉंसाहेब शहाजी महाराज शिवज्योत रथाच्या नेतृत्वाखाली सरसेनापती वीर बाजी पासलकर, सरदार कान्होजी नाईक जेधे, सरदार कृष्णाजी नाईक बांदल, सरनौबत सेनापती येसाजी कंक, नरवीर तानाजी मालुसरे, अटकवीर सरदार मानाजी पायगुडे, कान्होजी नाईक कोंडे, बाबाजी ढमढेरे, पिलाजीराव सणस, हैबतराव शिळीमकर, त्र्यंबकराव नाईक निंवगुणे, सरदार करंजावणे देशमुख, सरदार चांगोजी कडु, अढळराव बाबाजी डोहर धुमाळ, सुर्याजी काकडे, सरसेनापती हंबीरराव मोहिते, संताजी घोरपडे, सरदार महाप्राक्रमी गोदाजीराजे जगताप, सरनोबत सिधोजी थोपटे, झुंजारराव मरळ, शितोळे सरकार, तोरणा किल्लेदार गोंदाजी भुरूक, सरनोबत नागोजीराव कोकाटे, श्रीमंत माने सरकार, सरदार हिरोजी इंदलकर, श्रीमंत सरदार राऊतराव ढमाले, श्रीमंत सुभेदार खंडोजी माणकर, श्रीमंत सरदार दयाजीराव मारणे गंभीरराव, सप्तसहस्त्री सरदार नावजी बलकवडे, वीर माता धाराऊ गाडे, समुद्रस्वामी दर्यासारंग सरखेल कान्होजी आंग्रे, सरदार शिवाजी इंगळे, हिंमतबहाद्दर विठोजी चव्हाण, भोई बांधव, श्रीमंत राजे जाधव व राजे जाधवराव, गरुड घराणे, चंद्रवंशी (भोपतराव) श्रीमंत सरदार लुखजीराव घारे, महाशक्तीशाली सरदार संभाजी काटे, सरदार निंबाळकर घराणे, जगद्गुरु संतश्रेष्ठ संत तुकाराम महाराज भक्ती शक्ती स्वराज्यरथ, श्रीमंत हरजीराजे महाडीक, महाशक्तीशाली रणमर्द सरदार संभाजी कोंढाळकर, सरनोबत पिलाजी गोळे, सरदार प्रतापराव गुजर, सरदार वाघोजी तुपे, श्रीमंत पिलाजीराव राजेशिर्के, श्रीमंत महाराज छत्रसाल बुंदेला, श्रीमंत धार राजेपवार, श्रीमंत गायकवाड सरकार, श्रीमंत महाराज महादजी शिंदे सरकार, गुप्तहेर प्रमुख बर्हिजी नाईक, शिवरत्न शिवाजी काशीद जीवाजी महाले, सरदार जीवाजी सुभानजी रणनवरे, सरदार मल्हारजी तुकोजी निगडे, शुरवीर एकोजी शिरोळे, शुरवीर शेलार मामा, राजेश्री सरदार हांडे, श्रीमंत भोईटे, सरदार मांढरे, स्वराज्यनिष्ठ येसाजी कामठे, श्रीमंत हरजीराजे बर्गे, शिवरायांचे शिलेदार डिंबळे, श्रीमंत तापकीर सरदार, वीर सरदार मालोजी भिलारे, पानीपत वीर महादजी माळवदकर, पानीपत वीर महादजी व दादजी हरपळे, प्रतापगड युध्दवीर सहस्त्री सरदार कोडांजी वरखडे, दक्षिण दिग्वीजय वीर मानाजी मोरे, सरलष्कर खंडोजी दरेकर, स्वराज्याचे शिलेदार कुंजीर, स्वराज्यनिष्ठ शेळके, सरदार फडतरे, राजे साळुंखे चालुक्य राजवंश, स्वराज्यनिष्ठ सरदार बाबर, सिंहगड वीर विठोजी कारके, दुर्ग अजिंक्यतारा वीर किल्लेदार मानाजी साबळे, शुरवीर सावंत स्वराज्यघराणे, सरदार मंबाजी नाईक सोनवणे, सरदार थोरात, सरदार वाबळे, प्रतापगड युध्दवीर सहस्त्री सरदार रामजी पांगारे, स्वामीनिष्ठ खंडो बल्लाळ चिटणीस, सरदार काळे, वीर बाजीप्रभु देशपांडे यांचे स्वराज्यरथ आपआपला गौरवशाली इतिहास मांडत सहभागी झाले.

ईशान अमित गायकवाड यांवी सलग १५ व्या वर्षी शिवजयंती १९ फेब्रुवारीला शिवाजीनगर येथील एसएसपीएमएस संस्थेच्या प्रांगणातील शिवरायांच्या विश्वातील पहिल्या भव्य अश्वारुढ स्मारकावर हेलीकॅाप्टर मधून पुष्पवृष्टी केली . या अनोख्या इतिहासाच्या पार्श्वभूमीकर ईशान गायकवाड म्हणाले, आपल्या महाराष्ट्रात जन्मलेल्या प्रत्येकावर शिवरायांचे संस्कार हे लहानपणीच झाले असतात. शिवाजी महाराज म्हणले की आपसुकच आपण जय म्हणतो. माझे हे परमभाग्य आहे की शिवरायांच्या विश्वातील पहिल्या स्मारकावर मी सलग १३ वर्षे पुष्पवृष्टी करतो आहे. १९ फेब्रुवारीला विश्ववंदनीय शिवरायांचं आणि आमच्या गायकवाड स्वराज्यपरिवाराचे हे एक भावनिक नात निर्माण झाल आहे. श्रीमंत मालोजीराजे छत्रपती आणि पुणे पोलीस यांचे विशेष आभारही ईशानने यावेळी मानले.

हेलीकॉप्टर पुष्पवृष्टीचे संकल्पक अमित गायकवाड म्हणाले, आपण पुणेकर भाग्यवान आहोत. करवीर संस्थानाचे राजर्षि शाहू छत्रपती आणि त्यांचे पुत्र राजाराम छत्रपती यांनी शिवरायांचे हे स्मारक पुणे येथे निर्माण केले. शिवरायांचा एकसंध ओतीव काम केलेला हा विश्वातील एकमेव भव्यदिव्य पुतळा आहे. १६ जून १९२८ साली ह्या स्मारकाचे अनावरण झाले होत.पुतळ्याचे वजन तब्बल ८००० किलो आहे. शिवरायांच्या चित्तथरारक इतिहासा सारखाचा ह्या स्मारक निर्मितीचा इतिहास चित्तथरारक आहे.